ब्रह्म सनातन । पाहतां शांति वरींगा ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे पृथ्वी पाहातां । पूज्य आपणापें गा ॥ ३ ॥

पद १२७.

सहज सुखी । ज्यालागीं नाहीं कोण दुःखी ॥ ध्रु० ॥ प्रवृत्ति ज्याणें ही निवृत्ति भावोनि, झाली विषयांसिं दुर्विखी । सोहिरा ह्मणे पूर्णसनातनीं, वंदुनियां निजसौखीं ॥ १ ॥

पद १२८.

या बहु रूपीं अरे कां रे भुललासि ॥ ध्रु० ॥ कोठुनि येणें कोठें जाणें । काय येणें निदनासी ॥ १ ॥ ज्यांहीं दिधलें देह तुज निःसंदेह । तो तूं विदेह नोळखसी ॥ २ ॥ जीवरूपें शिव वर्तत आहे । प्रळयीं चुकवि यत्नासी ॥ ३ ॥ भवशरयुद्धीं आड करोनि जीवा । शिव करीत अवनासी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे जिवा वोळखीं । शिवरूप निरसितो भवबंधासी ॥ ५ ॥

---

३. वेदांतविषयक पदें.

पद १.

परब्रह्म भेटरे । प्रपंच हा फाटरे । दृश्यचित्र आटरे । मजमाजी सदोदित आनंदचि दाटरे ॥ ध्रु० ॥ त्रिकुटाचा घांटरे । वोलांडुनि सुषुम्नाकपाटरे । वरी नादाचा दणदणाटरे । बाहेर येऊं पाहतां नाहीं कल्पनेसी वाटरे ॥ १ ॥ विकासो ललाटरे । मोडो मनपवनाची राहाटरे । टाकुं श्रीहट गोल्हाटरे । औठ पिठावरूनी जाऊं भ्रमरगुंफे नीटरे ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे हा शेवटरे । लुटो अनुभवाची पेंठरे । फिटो मतांतर बोभाटरे । चारी वाचा निवांत पडती मुखें सुचेना गोष्टरे ॥ ३ ॥

पद २.

भुललें आजी हें मन ॥ ध्रु० ॥ जेथ दिवस ना राती । तेथ जीव घटाची हे माती । इंद्रिय आपापुलें खाती । जया पाहूं जातां झालीं तटस्थ नेत्रपातीं ॥ १ ॥ अरूपाचें रूप । तो हा आकाशींचा कूप । आंत बुडालें पुण्य पाप । देखुनि निर्वातींचा दीप ॥ २ ॥ लोपल्या बारा सोळा । तो बा नोहे गोरा काळा । त्यानें धरिला माझा गळा । देह चालती कळारे कळा ॥ ३ ॥ भेद मोडला हा माझा । चोहीं वाचातीत गुजा । आपणापें होतीं पूज्या । हें सुख सर्व सुखाचा राजा ॥ ४ ॥ न लावितां अग्न । आजी काया केली भग्न । प्रकृतिपुरुषाचें हें लग्न । आंत सोहिरा झाला मग्न ॥ ५ ॥

पद ३.

हृदयीं चिन्मयसुखाचा बोध जाहाला ॥ ध्रु० ॥ कांहीं नाहीं प्रतिकूळ । जाहालें स्वरूप अनुकूळ । जया याती नाहीं कूळ । पाहातां आपुलें तें मूळ । समूळ हा शब्द निमाला ॥ १ ॥ अहं सोहं भग्न । जाहालें तद्रूपतेसीं लग्न । सदा स्वयेंचि संलग्न । आपण अंतरींच मग्न । होउनी पूर्णानंदें धाला ॥ २ ॥ कीं ते नाम रूपावीण । निरालंब हे निर्गुण । घेतां तेथिल हे खूण । गेलें व्यापें व्यापकपण । केवळ जाहालें उगवण । कीं है अनादी बीजाला ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ज्ञेय । ज्ञातां झालें ब्रह्ममय । अविनाश अप्रमेय । अखंडित निरामय । कीं हें सद्गुरुचें गुह्य । कीं अद्वय अंमल प्याला ॥ ४ ॥

पद ४.

आरंभ रंभ स्तंभ निरालंब जागला ॥ ध्रु० ॥ सज्जनरंजनीं नित्य निरंजनीं ध्यासची लागला । त्रिकुट श्रीहट गोल्हाट औट पिठीं विरागला ॥ १ ॥ आनंदडोहीं बुडाला आठव ना-

हींच मागला । ज्याचिये सत्तेचा हाट इंद्रियांचा नव्हेचि पांगला ॥ २ ॥ सोहिरा पाहूं गेला तईंच निमाला । नाहीं उमगला ॥ ३ ॥

पद ५.

आजी म्यां सुखी झालोंची सये हो ॥ ध्रु० ॥ निरालंबीं पडली हे मिठी । कांहीं केलिया दिठी परतोनी नये हो ॥१॥ चित्कलिका विकासली । जाहाला चित्सूर्य उदय हो ॥ २ ॥ निरंजन नित्यानंद । निर्गुण निर्मल निरामय हो ॥३॥ सोहिरा ह्मणे निजधामीं । अनामीं गेलेंचि हें मन विलया हो ॥ ४ ॥

पद ६.

झालाहो झाला आनंद आजी ॥ ध्रु० ॥ इंद्रियां दमन, करोनी त्रिकुटीं गमन । होतां योगाचें नमन, नेणों काय झालें मन ॥ १ ॥ लागतां खेचरी मुद्रा, उल्हास हा चित्समुद्रा । पिउनि अर्धचंद्रा, आली सहज निद्रा ॥ २ ॥ चंद्र सूर्य बिंब, ग्रासुनिया प्रतिबिंब । सदा स्वयेंची स्वयंभ, विकासला निरालंब ॥ ३ ॥ बारा सोळा आकळा, अनुभव हा मोकळा । जिवशिव हें न कळे, सेविली सत्रावी कळा ॥ ४ ॥ तुर्या हे भोगुनि, गेलों आंतची विरागुनी । नये कल्पना मागुनी, लपटों उन्मनी लागोनी ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे ज्ञान, गंगा स्नान झालें गुरुदयेन । जेथ न पवती नयन, तेथ जाहालें शयन ॥ ६ ॥

पद ७.

काय झालें तें नयेचि सांगूं । अंतरींच भोगूं ॥ ध्रु० ॥ धृतिचा हा डोळा असतांची कल्पना बाहुली हे परतली । चालतां राहिली चालवी वाचा बोलतां निमाली ॥ १ ॥ पुढिलें हें थोकलें योजना मोडली आठवण मागली । दृश्य द्रष्टा मनीं न गणितां मीपण दोरीच हे काढिली ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आतां हारपली मुद्रा । सहजेंचि निद्रा उन्मनी लागली ॥ ३ ॥

पद ८.

काय मिळाली हें नयेची तुका । झालों म्यां मुका ॥ ध्रु० ॥ ॐकार कुंठला शब्द मावळला । न बोलावें अमुका ॥ १ ॥ बुद्धि विहंगिणी संसार तरुवरी । उडों जाता मुळींच मोडला डोंका ॥ २ ॥ साधन नका नलगेती रुका । सांपडलें फुका ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे भ्रांतितिमिर दवडुनी । तन्मय उजळुनी चिन्मयदीपिका ॥ ४ ॥

पद ९.

काय सांगूं सये बोलतांची नये । ज्या सुखालागोनी ॥ ध्रु० ॥ चोरुनी नेलें विश्वची येतां उरलाना मागोनी । तन्मय शेजे परा प्रमदा निमाली भोगोनी ॥ १ ॥ सोहिरा ह्मणे आतां तुर्येत जागोनी लागोनी उन्मनी । निजलों निरंजनीं जागणें त्या लागोनी ॥ २ ॥

पद १०.

काय म्यां सांगों गे माये नवल जाहालें ॥ ध्रु०॥ चैतन्यसिंधुमाजी सैंधव काया ही डोले ॥ १॥ निर्वात दीपीं कर्पूरीं प्रणव पतंग बोले ॥ २ ॥ आकाशावरी जळ त्यावरी कमळणी खोले ॥ ३ ॥ हात नाहीं पाय ऐसे भ्रमर गुंतले ॥ ४ ॥ नामची सुरतें केलें लया आमोदें नेलें ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे हें आंगाथिलें तें रूपाविण देखिलें ॥ ६ ॥

पद ११.

निजानंदीं मन सुरलें उरलें चैतन्य ॥ध्रु०॥ ज्ञानगंगे न्हालों, पूर्णत्वा आलों । झालों समाधान ॥ १ ॥ आत्मेसीं लग्न, होउनी नग्न । अंतरीं झालों मग्न ॥२॥ आसन वाहात, भासना पाहात । चित्सुख सिंधू आंत ॥३॥ नकरी उखी, विखी दृश्य न लेखी । झालों सदा सुखी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे काया, लटिकी केली माया । निर्गुण निरामया ॥ ५ ॥

पद १२.

ऐसें काय मिळालें कळेना ॥ ध्रु० ॥ चारी साहा त्रैलोक्य-मंडल। शमदमीं पाहातां कोठेंचि आढळेना ॥ १ ॥ जें जें दिसतें नयेचि सरितें। करितांची नासे वरी अनारिसें तें कवण-चि हें तुळेना ॥ २ ॥ मळ निर्मळ ह्मणे कल्पनाचि मळवी। आ-पण हें मळेना ॥ ३ ॥ संसारभयें भितें मनचि पळवी। आपण हें पळेना ॥ ४ ॥ अनुभवतरुवरी फुलेंविण फळलें। देंठा-विण फळ कर्दाची हें गळेना ॥ ५ ॥ जें जें दिसतें त्याणें त्याणें-चि चळे। परी आपण हें चळेना ॥ ६ ॥ निखिल चिन्मय बोध मुराला। मकारा उरला अढळ हा ढळेना ॥ ७ ॥ सो-हिरा ह्मणे मज हें घडलें। थकचि पडलें मन हें जडलें फि-रोनी कीं वळेना ॥ ८ ॥

पद १३.

उघडा कीं हा चाळवितो। कान डोळा हालवितो। दृश्य दिवा मालवितो॥ ध्रु० ॥ ब्रह्मरूप झाली दृष्टी। मुखें निघती त्याची गोष्टी ॥ १ ॥ आंगची झालें निरंजन। मन हें झालें उन्मन ॥ २ ॥ सूत्र धरोनी उभी माउली। हे काया खेळे बा-हुली ॥ ३ ॥ सकळ भरिलें तत्त्व निरीं। जग बुद्बुद हें तया-वरी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे हेंची धन्य। आंगीं भरलें चैतन्य ॥ ५ ॥

पद १४.

आमचा येथ अपराध काय, आंगीं भरलें निरामय। जो इंद्रियें चाळवी त्याणें धरिली आपली सोय ॥ ध्रु० ॥ डोळा जाहाला ब्रह्मरूप, वाचा करितें। आपला मनासी घडला हाचि तप ॥ १ ॥ इंद्रियांतें उपेक्षुनि, धारणा हे रक्षुनी। गेला आ-पुलें मुळ लक्षुनि ॥ २ ॥ ज्ञानवैराग्यें हा आगळा, भवीं अ-

सोनी वेगळा । झाला अभिमान हा पांगळा ॥ ३ ॥ नको पाहुं देहाची चाल, दृष्टी करोनी सखोल । घ्यावे तुह्मीं अनुभवाचे बोल ॥ ४ ॥ ऐसें कवणीं केलें कवण जाणें, सोहिरा ह्मणे मीं हें नेणें । पदरीं बांधिलें अविनाश देणें ॥ ५ ॥

पद १५.

आनंद जिराला । चिन्मयबोध मुरला ॥ ध्रु० ॥ नाहीं एक दुजेपण आपेंची आपण ही नसेल । तेची काय असेल ॥ १ ॥ असलेंपणहि नासलें । मज म्यां ग्रासिलें ॥ २ ॥ न कळोनियां कळलें । कळलें पण ही गळलें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे दाऊं कसें । तुला काय दिसे ॥ ४ ॥

पद १६.

स्थिरावली निजदिठी । आपणापें पडली मिठी ॥ ध्रु० ॥ आगमानिगमा गुज, तेचि सुख स्वयें बूज । लागली सहज नीजहो ॥ १ ॥ चहुं शून्य महा शून्यीं, बुडोनि लाधलें मौन्य । भोगिलें चित्सुख चैतन्यहो ॥२॥ आकाशाचा भरला कुंभ, कवणीकडे प्रतिबिंब । विकासला निरालंबहो ॥ ३ ॥ जेथ गेल्या नाहीं येणें, हें कीं ज्याचा तोची जाणें । कुंठलें वाचेचें बोलणेंहो ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे मजमाजी, मावळली निजीं । निज गैव जाहाला योगिराज हो ॥ ५ ॥

पद १७.

माजी मेळ वेळ नलगता झाला समाधी ॥ ध्रु० ॥ मन हें कन्या, वर वरी शून्या । लागोनी मौन्या, चैतन्या ॥ १ ॥ कान ना डोळा, या निराळा । दिसे हे लीला, जग बुद्बुद जळामाजी ॥ २ ॥ जगदभ्र व्योमा, पूर्णकामा । हृदयआरामा, आत्मारामा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे गैवा, मूलबिंबा । आरंभस्तंभा, निरालंबा ॥ ४ ॥

पद १८.

सत्ता तोचि हा ऐसा निःश्चय जाहाला पाहा ॥ ध्रु० ॥ भ्रांती ओंगळी, झाली पांगळी। जनीं आगळी, अंतीं वेगळी ॥ १ ॥ प्रवृत्ति सरती, निवृत्ति हरती। विवेका वरती, होउनी उरती ॥ २ ॥ आहे अभाव, रूप नाव। दिसे हे माव, लटिकें लाघव ॥ ३ ॥ न चलें तर्क, जईं अर्क। झाला गर्क, तें हें अतर्क्य ॥ ४ ॥ भूलीव भूलती, अबोल बोलती। योगी खुलती, अंतरीं डुलती ॥ ५ ॥ म्हणे सोहिरा, वाचे गूज। तें आपुलें निज, अनादि बीज सहज ॥ ६ ॥

पद १९.

सद्गुरुकृपेनें भाग्य ऐसें आलें। ब्रह्मानंदीं मन संतुष्ट झालें ॥ ध्रु० ॥ सांपडली हे सुषुम्नीची वाट, देखियला हा विवेकाचा हाट। तेथ झाली हे सद्वस्तुचि भेट, रूपरेख नाहीं पाहातां पाठी पोटरे ॥ १ ॥ आदी अंत पाहातां नाहीं शून्यीं, शून्य समावलें ज्या चैतन्यीं। अनिर्वाच्यीं होउनी ठेलों मौन्यी, निद्रा लागली सहज उन्मनीरे ॥ २ ॥ तत्त्व सेवियलें जें सज्जनीं, दिठी सूदली त्या ज्ञानांजनीं। तेणें तेजें लोपली दिनरजनी, निधी लाधली पूर्ण निरंजनीं ॥ ३ ॥ उमजों गेलों म्यां कवण ऐसें आधीं, मग्न झालों त्या अनुहात नादीं। निजबोधें गगन समाधी, सर्वां आधीं हें स्वरूप अनादी ॥ ४ ॥ पडला चित्सूर्याचा हो प्रकाश, केला अद्वयाब्धीनें विकाश। अध ऊर्ध्वीं कोंदलें चिदाकाश, अनुभव हृदयींचा वदला सोहिरा दास ॥ ५ ॥

पद २०.

परतोनि मागुति आतां नये हे दिठी ॥ ध्रु० ॥ योगाचिया त्रुटी, करोनि शून्याचीये भेटी। लागीं आलों उठाउठीं, स्थिर

बैसलों गोल्हाटीं ॥ १ ॥ अभ्यास वारुवावरोनि, सुषुम्ना विवर फोडोनि । झालों परे पार उतरुनि, निजमुखा सर्वे पडली कीं मिठी ॥ २ ॥ वैखरी मध्यमे माजी, विराली सहजीं । पुढें आली निज निर्जी, मुखें सुचेना गोष्टी ॥ ३ ॥ स्वानुभव हाटीं, स्वानुभूति हे गोमटी । प्रेमें होउनियां भेटी, पदरा दिधली गांठी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे निजपदपटीं, तें रूप डोळियां वाटीं । पिउपिउनि उमजेना, काय जाहालें शेवटीं ॥ ५ ॥

पद २१.

आह्मीं नव्हे हो पांचांतले नव्हे पंचविसांतले । येवढ्यालाहि वळखोनीया वेगळे आह्मी आंतले ॥ ध्रु० ॥ रज सत्व तम आम्हीं नहों त्रिगुणांतले । केवढाही प्रपंच केला तरी नहीं त्यांतले ॥ १ ॥ आह्मी नव्हे हो मंत्रांतले आह्मी नव्हे हो तंत्रांतले । बहुत बोलुनि काय नहो मायेच्या यंत्रांतले ॥ २ ॥ आह्मी नव्हे हो लक्षांतले आम्ही नव्हे पक्षांतले । सोहिरा ह्मणे अनिर्वाच्य केवळ अलक्षांतले ॥ ३ ॥

पद २२.

कांहीं नाहीं जेथ तेथ झालें रूपा आलें हो ॥ध्रु०॥ अनादी हा अरूप, साक्षी जैसा दीप । तेथुनियां नाम रूप, एकेक निघालें हो ॥ १ ॥ जितुकें चराचर, दृष्टी गोचर । आंत अगोचर, चैतन्य रिघालें हो ॥ २ ॥ विस्मरतां सोहं, उठलें हें कोहं । देहबुद्धि अहं, विषयीं हें लाधलें हो ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हृदयीं प्रकाशलें, पूर्ण ज्ञानकमळ विकासलें । दिसलें हें भासलें, तेंचि मुखीं गालें हो ॥ ४ ॥

पद २३.

उन्मनी हे लागली ॥ ध्रु० ॥ चित्तवृत्ति हे विरागली, न आठवण मागली । तन्मयेंसी जागली, चिन्मयीं मुखीं निज-

तांना उमगली ॥ १ ॥ कल्पना उल्लंघिली, कवणें नेणों भोगिली । हे रूपाविण चांगली, सोहिरा ह्मणे न सांगोनियां सांगली ॥ २ ॥

पद २४.

मज परम सुखी केलें तेणें हो ॥ ध्रु० ॥ सार्थकचि केलें नरदेहाचें, निरसनची केलें संदेहाचें । दिव्य दर्शन झालें विदेहाचें, सर्व विश्वचि चळतें तेणें हो ॥ १ ॥ अवघें दुमदुमिलें आकाश, दिनरजनी विहित प्रकाश । झाला निरंजनींचि विकाश, आतां पुन्हा जन्माला नाहीं येणें हो ॥ २ ॥ हें साध्यचि वाटे देहपण, दिधलें अविनाश देणें । सोहिरा ह्मणे मीं त्याचें, स्वरूप नेणें हो ॥ ३ ॥

पद २५.

मन मग्न केलें गुरुनाथें ॥ ध्रु० ॥ स्वरूप कळलें, मीपण गळलें । मिळलें आनंदातें ॥ १ ॥ सहज पिसावलें, सुखीं विसावलें । पावलें मोक्षपदातें ॥ २ ॥ शून्यचि जितलें, निर्गुणीं रुतलें । गुंतलें निजछंदातें ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा, सुलीन होउनी । तल्लिन झालों अनाहतनादातें ॥ ४ ॥

पद २६.

अवचटची आजी ऐशी गुरुकृपा हे फळली, आपुलें हें रूप पाहतां कल्पनाचि हे गळली । अनुभव तेजामाजी देहबुद्धि हे जळाली, निरंजनीं दिपवाळीची दिपमाळी उजाळली ॥ ध्रु० ॥ ज्ञानदिठी पाहुं जातां झाला संसारचि लटका, सत्ता रूप कळों आलें तव यत्नचि हा झुटका । बंधाचीही दोरी तुटली तंव झाली कीं हे सुटका, गैबचि हा प्याला प्यालों पूर्ण प्रेमाचा घुटका ॥ १ ॥ इंद्रियें हीं शोधूं गेलों तंव हारपली साक्ष, अधऊर्ध्व टाकितां हें मौन्य आलें कीं प्रत्यक्ष । विहंगम

उडों गेला तव मोडले पक्ष, असों कीं हें देह नसो सोहिरा झाला अलक्ष ॥ २ ॥

पद २७.

अहंकार हा मुंडा कल्पना हिजडीसंगें नाचे चहुंकडे ॥ ध्रु० ॥ नारी पुरुषाविण हिजडियेचें रूप । अविवेक मुखें करी विषयीं आलाप ॥ १ ॥ विचाराची दाढी बोडुनि दावी सुरेखपण । ह्मणोनी सज्जनीं तें न देखावें आपण ॥ २ ॥ स्थिर भूमी हिजडी हिचा पाय नधरे निका । धरीं जातां मुंडा ठोकी भेदाचा हा धुमका ॥ ३ ॥ सर्वांगीं हिजडी नेसे वासनेचें लुगडें । द्वेषाचा दक्षिणांगीं पदर सोडिला मुंडें ॥ ४ ॥ निवृत्तीचे पाठीवरी तृष्णेची हे वेणी । नेत्रद्वारें पाहूं जातां घातलें गवसणीं ॥ ५ ॥ हिजडियेचे कानीं अनर्थाचीं तानवडें । पाहूं जातां महामोहें मोहुनीच पाडी ॥ ६ ॥ इंद्रियांच्या द्वारीं गुंतुनी पाडिसी कां अलक्ष्या । लोभ टाकुनि झडकरेंसी चल चल दे भिक्षा ॥ ७ ॥ दान धर्मव्रतें आह्मा दाणे ह्मणति नका । आशेचा क्षण न पाहतां दृश्य पैसा टाका ॥ ८ ॥ सोहिरा ह्मणे दे परता जाउंदे खटपट । निघोनि गेलिया आहे समाधीच नीट ॥ ९ ॥

पद २८.

वैराग्य हें लागेल रावा, अंतरसुख हें जागेल बावा । निशाण हे शून्याची भेटी, होईल चैतन्याची दृष्टी ॥ १ ॥ दृश्यातीत वृत्ती पैसा, समर्थ तुज एक जोडेल ऐसा ॥ २ ॥ सहज करूं नकोचि यत्न, अमोल्य रत्न जोडेल दादा ॥ ३ ॥ जग बुद्बुद कीं एकचि अंबु, बोध हा होईल बाबु ॥ ४ ॥ अनुतापाचें उगवेल साळक, विवेक पोटीं होइल बाळक ॥ ५ ॥ निद्रेमाजी होसिल जागा, मन पवनाच्या बांधसिल पागा ॥ ६ ॥ अबोल वाचे बोलसिल बाबा, सोहंबिज वृत्ती झुलतिल दादा ॥ ७ ॥ निः-

कामीं हे वृत्ति बुडती, कामधेनूचीं चंवरें पडती ॥ ८ ॥ झालिच नाहीं दिसेल काया, समाधि तुज एक जोडेल राया ॥ ९ ॥ भक्ति मुक्तिसीं विकेल भाई, कैवल्यसुख हें पिकेल बाबा ॥ १० ॥ सोहिरा बोले पिंगळा ऐसा, देहीं असोनि वेगळा दादा ॥ ११ ॥

पद २५.

आजी चंद्रासारिखा हाता आला, सूर्यासारिखा भय पडला, गगनासारिखा घांट जेथ ॥ १ ॥ आजी आत्म्यासारिखा समर्थ, विरक्तीसारिखा परमार्थ, बोलासारिखा अर्थ, हाता आला ॥ २ ॥ आजी करणीसारिखी चाल, मौन्यासारिखा बोल, विवेकासारिखें नवल, वाटलें जेथ ॥ ३ ॥ आजी अकर्त्यासारिखी करणी, जिवंतासारिखा मरणीं, वैराग्यासारिखी हरणी, निवाली जेथ ॥ ४ ॥ आजी अकर्त्यासारिखें वर्म, अजन्मासारिखें कर्म, भ्रांतीसारिखा भ्रम, हरला जेथ ॥ ५ ॥ आजी अलक्ष्यासारिखी माता, गगनासारिखा पिता, वायुसारिख्या सुता, जन्म झाला ॥ ६ ॥ आजी तेजासारिखी लेंक, उदकासारिखा लेक, पृथ्वीसारिखा मोदक, दिधला हातीं ॥ ७ ॥ आजी जनासारिखें वन, अभिन्नासारिखें भिन्न, चैतन्यासारिखें चिन्ह, दिसतें कीं हें ॥ ८ ॥ आजी आइत्यासारिखा यत्न, चैतन्यासारिखें वतन, अमोलासारिखें रत्न, जोडलें कीं हें ॥ ९ ॥ आजी निरंजनासारिखी वस्ती, सोहंबिजासारिखा हत्ती, बोधासारिखी मस्ती, आंगा आली ॥ १० ॥ आजी आलेखासारिखा जोगी, अनुहातासारखी शिंगी, अरूपासारिखा सोंगी, भासला आजी ॥ ११॥ आजी प्रेमासारिखा पुर, गगनासारिखा अंकूर, कैवल्यासारिखा आगर, पिकला जेथ ॥ १२ ॥ आजी ज्ञानगंगेसारिखें स्नान, अनुभवासारिखें भोजन, समाधी-

सारिखें शयन, मिळालें आजी ॥ १३ ॥ आजी सोहिन्यासारखा जोशी, सद्गुरुसारिखा पोशी, संतोषासारिखा सुखवाशी, करोनि ठेला ॥ १४ ॥

पद ३०.

सद्गुरु प्रसन्न जाहला, विश्रांतीसीं हृदयीं आला। पूर्णानंदीं जीव धाला, अखंडाकारें ॥ ध्रु० ॥ दृश्य भान छेदिलें, चंद्रमंडळ भेदिलें। पिंडींच या शोधिलें, आत्मया रामा ॥ १ ॥ जेथ सुखावले संत, ज्ञानवनवसंत। विवेक जाहाला पसंत, सर्वदेखणा ॥ २ ॥ विश्व चळतें कीं हें जेणें, तया नाहीं येणें जाणें। मार्गस्त जिवाचें पेणें, देह हें जाणा ॥ ३ ॥ ब्रह्म व्यापक जेथवरी, अनुभव जाहला तेथवरी। आतां कांहीं हेत वरी, राहिला नाहीं ॥ ४ ॥ संसार हा बाजार, करितां न पवे आजार। सुटला आहे सेजार, अहंकाराचा ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे समाधिस्त, जया नाहीं उदो अस्त। संप्रज्ञाति छंदस्त, स्वात्मसुखें या ॥ ६ ॥

पद ३१.

आपेंचि लागली जेथ उन्मनीं नीज ॥ ध्रु० ॥ संकल्प हा त्यजिला, त्यजुनि गुजबुजला, बुजुनी निवातचि निजला, करोनि चिन्मय सेज ॥ १ ॥ मनबुद्धि एक घडले, सुषुम्ने सवें भिडलें, दशवें द्वार उघडलें, समूळेसी संसारा या पडलें कीं पूज ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आलें, मौन्य शून्यामाजी गेलें, शून्य उरलें हें चैतन्य, निरालंब सहज ॥ ३ ॥

पद ३२.

निजजनवसंत सुखावले जिच्या संगालागोनी ॥ ध्रु० ॥ आदी अंत नाहीं जिसी, पूर्णानंदाची रासी। भोगिति हे निज ध्यासी, श्रवणमननीं ॥ १ ॥ नाहीं जेथ यम नेम, आपणापें आ-

राम । शुद्धसुमन शमदम, मदनमालिनी ॥ २ ॥ टाकिलें हें त्रिकूट, भेदोनियां श्रीहाट । बस्तीला गोल्हाट, औटपीठवासिनी ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे चतुष्पदा, भोगुनियां परम पदा । भोगिती अनुपम्य स्वादा, तुर्या उन्मनी ॥ ४ ॥

पद ३३.

ब्रह्मबोधेंचि निवालों । आतां काय म्यां बोलूं ॥ ध्रु० ॥ पाहातें पाहाणें उडालें, लक्षचि बुडालें । कोठें नेणें विसावलों ॥१॥ असलेपण न मोडतांची, म्यां नसलेपणेंचि । असें कांहीं न होउनियां ठेलों ॥ २ ॥ कोणें कांहींची ना दिधलें, नेणों कैसें समाधान हें झालें । नित्य डोलोंचि लागलों ॥ ३ ॥ प्रतीतिपाखीं उडों गेलों, पहिलाचि पांगळलों । अवघें अंबरचि झालों ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे आंगीं आलें, गार्डे मौन्यचि माखिलें । माझा मजचि म्यां प्यालों ॥ ५ ॥

पद ३४.

परब्रह्मपद भोगी । हा जोगी ॥ ध्रु० ॥ मुखाविण कैसी, वाजविती पाहा । अनाहत शिंगी ॥ १ ॥ आंगचि नाहीं, हे प्रतीतीचि । पुरी गोदडी हे आंगीं ॥ २ ॥ म्होरें आलें, दृश्य कदाची । नेघे झाला वितरागी ॥ ३ ॥ भोगहि न ह्मणे, त्यागहि न जाणे । सोहिरा रमला राजयोगीं ॥ ४ ॥

पद ३५.

झाला ब्रह्मबोध । लागली समाध ॥ ध्रु० ॥ सुषुम्नेच्या छिद्रीं, स्थिरावलों ब्रह्मरंध्रीं । भेदोनियां नादबिंद ॥ १ ॥ मना वाचे नाकळे, ऐसें देखिलें निराळें । रूपाविण हें अगाध ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे काय वानूं, हरपलें देहभानू । सद्गुरु भेटला हा सिद्ध ॥ ३ ॥

पद ३६.

झालें हो समाधान । गुंतोनि कोठें नेणों ठेलें हें मन ॥ध्रु०॥ त्रिकुटाचे वाटे, उघडोनिया द्वारीं वटे । भेटे आलों कोण नेणों कोठें अवचटें ॥ १ ॥ पुढिली हे कीं मागली, नेणो कैंचि चांगली । अतर्क्यचि लागली निद्रा हे सहज ॥ २ ॥ जन्म नाहीं मरण, जेथ व्यक्त नाहीं वर्ण । सोहिरा सच्चिदानंदीं आजी पूर्ण ॥ ३ ॥

पद ३७.

लागोनि लगन मगन मन ठेलें हो ॥ ध्रु० ॥ काया नाहीं माया तया, ठाया लया गेलें हो ॥ १ ॥ हृद्गत सदया हृदया, उदया आलें हो ॥ २ ॥ संकल्प हा क्षया जाउनी, अक्षयदया त्यालें हो ॥ ३ ॥ आरंभरंभस्तंभीं, निरालंबीं गैब झालें हो ॥ ४ ॥ तुटका संसार घोंटुनि झुटका, प्रेमघुटका प्यालें हो ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे जेथुनि येणें, ज्याचें त्याणें नेलें हो ॥ ६ ॥

पद ३८.

लेइलें आजी चिन्मय लेणें ॥ ध्रु०॥ आंगाहुनी जन्हि, दुजें नाहीं । सबाह्य पाहीं, सर्वांगीं देखणें ॥ १ ॥ अवचित घडलें, मौन्यचि पडलें । अंतरीं जडलें, तें मन बुद्धि नेणें ॥ २ ॥ कर्मा गाळवी, वर्मा आळवी । इंद्रियें चाळवी, कवण येणें ॥ ३ ॥ पाहातां न दिसे, दिसत्याविण असे । सकळ प्रकाशे, जग चळे जेणें ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे, पावलों निजखुणे । दिधलें येणें, अविनाश देणें ॥ ५ ॥

पद ३९.

मन हें ब्रह्मबोधें बुडालें ॥ ध्रु०॥ आत्माग्नीचें दर्शन न होतां, कर्पुरमानें उडालें ॥ १ ॥ चित्सुख सिंधु पाहूं जातां, सैंधव मान विरालें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मज माजी आतां, नेणों काय झालें ॥ ३ ॥

पद ४०.

आतां काय मी हो बोलों । किं उगा आनंदेंचि डोलों ॥ध्रु०॥ दिठी गेली हे परतोनि नये । सांगों येतां बुडाली सये ॥ १ ॥ आनंदहीन राहाणें । हें वर्म ज्याचा तोचि जाणें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणें पाहूं गेलों । गेलेपणहि विसरलों ॥ ३ ॥

पद ४१.

हें लाधलें सहज मौन्य । कीं शून्यामाजी गेलें शून्य ॥ध्रु०॥ जीव शिव भेदाचें दैन्य । फिटोनि प्रकाशलें चैतन्य ॥ १ ॥ निरालंब हें गगन । शेजे घातलें उन्मन ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे केलें शयन । जेथें न पवती नयन ॥ ३ ॥

पद ४२.

विहंगम अवचटीं उडाला । चंद्रमा सागरीं बुडाला ॥ ध्रु० ॥ जळाविणें सिंधु देख तमासा । राहिला कैसा मासा सवें चंद्रमा नेला ग्रासा ॥ १ ॥ अग्नि अमीषा लुब्धुनि पडला । भुंगिमुखीं मासा ॥ २ ॥ निजमुख गोडाला भुंगी मिळाली । उत्तर नये तोंडाला ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ही खुण उमगी । तोचि जाणावा योगी ॥ ४ ॥

पद ४३.

तरि म्यां कैसेनि हो पांगला ॥ ध्रु० ॥ बद्धता मुक्तता ह्मणें हा कवण । मी पाहूं जंव गेलों लागलाचि ना लागला ॥ १ ॥ आदी पाहूं गेला अंतींहि विसरला । नाहींचि उमगला ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आतां ज्ञान अज्ञान हें । न बोलतां उगा राहिलों चांगला ॥ ३ ॥

पद ४४.

सदोदित लागली उन्मनी ॥ ध्रु० ॥ महाशून्य निरामय, निर्गुण निरंतर । राहिलों निरंजनीं ॥ १ ॥ तप्त लोहो तेंवी, आ-

त्मारामीं हें। जीवन मानें मन, गेलें कीं जिरोनि ॥ २ ॥ भ्रमर गुंफे सिंधु, सैंधव हे दिठी। गेलीच आतां, नये कीं फिरोनि ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे आतां, चालतां बोलतां। कोणचि नाहीं, अभिमानी ॥ ४ ॥

पद ४५.

निजसुख सेवूंचि लागलों ॥ ध्रु० ॥ सेवि तेंचि सरे, अपार तें उरे। आपणचि भागलों ॥ १ ॥ बैसतें स्थान, तें मान विसरलों। तटस्थचि झालों, तेथचि कीं विरागलों ॥ २ ॥ सोहिरा ह्मणें, कवणे ठायीं हें। काय सेवियलें सांगूं, नाहींचि उमगलों ॥ ३ ॥

पद ४६.

नेणों काय ऐसें घडलें ॥ ध्रु० ॥ नावाथिलें मन, शोधूं हें जातां। जातेनसीं दडलें ॥ १ ॥ आपणा मोडुनि, लंपट होउनी। कवणासि हें जडलें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे वाचा, खुंटुनी अवचटें। मौन्यचि मग पडलों ॥ ३ ॥

पद ४७.

सये मज लागली सहज समाधी ॥ ध्रु० ॥ पाहातां सखोलचि, रूप अलोलचि। बोलतां बोलचि नये ॥ १ ॥ शांति अरविंद, अमोद सोहंमद। पूर्ण प्रबोध सदय ॥ २ ॥ मजमाजी माहेर, रम्य मनोहर। सुंदर मेरु निलय ॥ ३ ॥ सज्जन रंजनीं, नित्य निरंजनीं। सोहिरा ह्मणे झालों लय ॥ ४ ॥

पद ४८.

गुरुजि आलेख निरंजन ॥ ध्रु० ॥ व्यक्त ना वर्ण, तें ऐकोनि कर्ण। निवालें अंतःकरण ॥ १ ॥ ज्याचिये दयेनें, समाधी शयन। स्थिर झाले नयन ॥ २ ॥ दिवस ना राती, तैल ना वाती। उजळली दीपज्योति ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे, आरंभरंभस्तंभ। विकासला निरालंब ॥ ४ ॥

पद ४९.

हरला काम झालों आराम जडला आत्माराम । विश्वाभ्रम व्योम जें निजधाम नाहीं रूप नाम ॥ध्रु०॥ त्रिवेणी संगम त्यावरी उगम लाधला सुगम। झालों परा गमना पुनरागम उडाला विहंगम ॥ १ ॥ निज नरेंद्रा ज्ञानसमुद्रा पेउनी अर्ध चंद्रा । मध्यें मच्छिंद्रा खेचरी मुद्रा ही लागली सहज निद्रा ॥ २ ॥ दिसत नासत असत ज्यां असलाचि असें संत। आदी ना अंत कैंचि घसंत हाचि चित्सुखवनवसंत ॥ ३ ॥ संसार चित्र पुसोनि हे नेत्र ज्यां झालों कीं स्वतंत्र। ना जन्मपत्र ते कैंचें गोत्र नलगेचि दुसरा मंत्र ॥ ४ ॥ नलगे आराधन लाधलें हें धन ओळला चिद्घन। पवनही गवसोन मुरालें हें मन झालें कीं उन्मन ॥ ५ ॥ पूर्ण प्रबोध अमोद समाध हे लाधली अनादि सिद्ध । जो मूलकंद मुकुंद स्वयें मज माजी अद्वयानंद ॥ ६ ॥ ना प्रतिबिंब हाचि हा स्वयंभ विकासला निरालंब । आरंभरंभस्तंभ पाहातां आंतचि झालों गैब ॥ ७ ॥ सोहिरा ह्मणे देहभानचि हरलें चालणें बोलणें सरलें। तन्मय विरलें चिन्मय मुरलें काय नेणों हें उरलें ॥ ८ ॥

पद ५०.

आरंभरंभस्तंभ निरालंब स्वयंभचि झालों ॥ ध्रु० ॥ मूळ आलें हाता पाहातां पाहातां आंतचि निमालों। सोहं बीज निज गुज बुजोनियां ठेलों ॥ १ ॥ संगचि सोडी आत्मा आवडी झाली हे जोडी। मनाच्या ओढी अनेक मोडी लागली हे गोडी ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे सये तन्मय मुरलें उरलें चिन्मय। आपणा गांठीं पडली मिठी दिठी परतोनि नये ॥ ३ ॥

पद ५१.

तो मी मिनलों आपुल्या उगमीं ॥ ध्रु० ॥ प्रपंच वाढे, मोडे पांर मज। विसर आपुला न पडे ॥ १ ॥ उठला भास, पावे

नाश । स्वरूप निराभास ॥ २ ॥ देहासि या जाणे, आपुली हे लीला म्हणे । परि या संगें नाहीं येणें जाणें ॥ ३ ॥ घटमठीं अवकाश, तैसा जीव ईश्वर हा भास । तो गेलिया उरते हें आकाश ॥ ४ ॥ अवस्थात्रया, टाकुनी माया । अंतीं जाय लया ॥ ५ ॥ वीत अग्न आजि माया केली भग्न, प्रकृति पुरुषाचें हें लग्न । आंत सोहिरा झाला मग्न रे मन भुललें ॥ ६ ॥

पद ५२.

नीजरे लागली मज, केली हे चिन्मय शेज, उपमे अतित तेज, हारपलें सोहंबीज ॥ ध्रु० ॥ जेथुनि जन्मली काया, पावलों त्या निज ठाया, त्यागिली लटिकी माया, मन हें गेलें विलया ॥ १ ॥ होउनियां तन्मय, ठेलें कीं हें निरामय, अगोचर सुख सये, दिठी हें परतोनि नये ॥ २ ॥ राहिल्या सकळ गोष्टी, मिथ्याचि भासली सृष्टी, वोळली चिद्घनवृष्टी, सुळीं मावलि दृष्टी ॥ ३ ॥ उल्हास चैतन्य सिंधु, उदेला अर्ध इंदु, सेविला पूर्ण बिंदु, झाला कीं हा आनंदु ॥ ४ ॥ कवणचिया प्रतिबिंबीं, पाहा ना आरंभस्तंभीं, पावलों ज्यां अवलंबीं, स्थिरावलों निरालंबीं ॥ ५ ॥ बोधचि हा त्रिशुद्धि, माझी मज नाहीं शुद्धि, विराली समूळ बुद्धि, सदोदित समाधी ॥ ६ ॥ दीन नाहीं रजनीं, तेथचि कीं रंजोनी, निर्गुण निरंजनीं, सहज हे उन्मनी ॥ ७ ॥ कासया हें बंधन, सोहिरा म्हणे साधन, सांपडलें निजधन, झालों आतां समाधान ॥ ८ ॥

पद ५३.

लागला निजध्यास अविनाश सुखाचा ॥ ध्रु० ॥ निराकार निर्गुण निरंजन निरामयाचा ॥ १ ॥ धन्य हें मौन्य महाशून्य चैतन्य अखंडिताचा ॥ २ ॥ ज्ञान निरवधि समाधी सहज सकळ कळानिधीचा ॥ ३ ॥ कलिमलदहन गहन मन-

मोहन दयार्णवाचा ॥ ४ ॥ काया दंडन नलगे मुंडन रुका हा सदां फुकाचा ॥ ५ ॥ निःकाम आराम हा राम कल्पद्रुमाचा ॥ ६ ॥ दुमदुमिलें अंबर स्थिरावली नजर होताहे गजर अनाहत ध्वनीचा ॥ ७ ॥ ह्मणे सोहिरा दास उदास हा छंद सचिदानंदाचा ॥ ८ ॥

पद ५४.

नीज लागली हे उन्मनीं ॥ ध्रु० ॥ निःकाम हा राम आराम ॥ १ ॥ नाभ्युमना व्योम अनाम निजधाम ॥ २ ॥ मना लागलें गोड सुख हेंचि अखंड ॥ ३ ॥ बुद्धि विरागली सई ना मागली ॥ ४ ॥ झालों कीं समाधान अंतरींचि मग्न ॥ ५ ॥ दृश्य या निराळा झांक आली डोळां ॥ ६ ॥ स्वप्न ना सुषुप्ति तुर्या ना जागृती ॥ ७ ॥ शून्याचिये बाजे चैतन्याचे शेजे ॥ ८ ॥ उदो नाहीं अस्त तेथ आजी स्वस्थ ॥ ९ ॥ सोहिरा ह्मणे हें गुज समाधी सहज ॥ १० ॥

पद ५५.

मन हें आजी सच्चिदानंदें वेधलें, जन्मा येउनी परम सुख हें साधलें, अंतरीं मीं हा कोण ऐसें शोधिलें, सहज ब्रह्मबोधें बोधलें ॥ ध्रु० ॥ संसारींहुनि सुटलें, मन हें आजी विषयभोगासी विटलें, आपण सर्वांगेंसी फुटलें, दश लटिकें हें लिगाड तुटलें ॥ १ ॥ राहिली मींपणाची हे कळवळ, निवाली त्रिविध तापांची तळमळ, गेली संशयाचि हे-खळबळ, झालें निःकाम निःसंग निर्मळ ॥ २ ॥ संकल्पाचे साहुले सोडुनि नग्न, होउनि ठेलें आत्मेंसीं हें भग्न, नाहींपणा लागोनी गेलें लग्न, अनुभवसुखीं आंतचि झालें मग्न ॥ ३ ॥ आपुलिया उगमीं स्थिरावलें, निद्रा समाधीमाजी सामावलें, निश्चळ निराळीं पूर्ण गोवलें, सायुज्य अविनाश पदा पावलें ॥ ४ ॥ पूजा विधी विधान पारुसलें,

सकळ कर्माकर्म लया गेलें, सिद्ध फळ हें परिपक्कतेसी आलें, पाप पुण्या विरहित होउनि ठेलें ॥ ५ ॥ कांहीं कल्पावेंचि सोडिलें, चळतां देहाचें भान मोडलें, सगुणींचि हें निर्गुण जोडलें, सोहिरा परमामृतसागरीं म्हणे बुडालें ॥ ६ ॥

पद ५६.

लागलें मन गुरुचे चरणीं ॥ ध्रु० ॥ टाकुनि अगन, पवन गगन । आप हे धरणी ॥ १ ॥ नाना कुंभीं, हा प्रतिबिंबीं । एकचि तरणी ॥ २ ॥ जो कां अनाम, आत्माराम । आराम नामस्मरणीं ॥ ३ ॥ आगमानिगमा, नकळे जाची । अघटित हे करणी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे, म्यां पुनरपि । न पडें जन्ममरणीं ॥ ५ ॥

पद ५७.

काय म्यां सांगों सये बोलतां नये हो नवलाचा जोगी । मुखाविणें कैसी वाजवी गैब गाजवी ज्याची अनाहत शिंगी । संसारीं असोनी नाहीं हो नीट पाहीं हो ऐसा नित्य वैरागी ॥ ध्रु० ॥ टाकुनि त्रिविध त्रिगुणी लक्ष्य निर्गुणीं लाउनियां अखंड । नासिवंत ऐसें जाणुनि ध्यानीं आणुनि त्यजीं पिंडब्रह्मांड । मन पवन हेलाकलें नेत्र झांकले काय बोलों उदंड ॥ १ ॥ दुधामाजी घृत जैसें हो रूप तैसें हो मायेमाजी हा गुप्त । सर्वी सर्वत्र हा व्यापक जगन्नायक परमानंदें तृप्त ॥ २ ॥ पटामाजी जैसा तंतू हो आदी अंत हो जैसा बीजीं हा वट । तैसा सकळ हा विस्तार ज्याचा निरंतर जैसा गगनीं घट । सोहिरा ह्मणे तो हा आळेख नाहीं रूप रेख झाला मजमाजी प्रगट ॥ ३ ॥

पद ५८.

जन्मा आलियाचें काज हो झालें आज हो सांपडलें हें मूळ । कोठिल कोण हें पाहातां तेथ राहातां जया याती ना कुळ ।

येणें जाणें नाहीं जयासी जैसें गगनासी वरि मायेचा खेळ। टाकुनि सकळिक बोलणें नित्य डोलणें ब्रह्मानंदीं केवळ ॥ ध्रु० ॥ सर्वी सबाह्य हा व्यापक सुखदायक जया आदी ना अंत। देहीं असोनियां नाहीं हो कळा पाहीं हो ऐसा गैब अतीत। पाहाणें परतोनि पाहा हो तेथ राहा हो जो कां महा महंत। त्रिभुवनींचा राजा हो स्वामी माझा हो भेटला भगवंत ॥ १ ॥ आतां करणें कांहीं नलगे पूजा हो देव दुजा हो कीं हें अनादी बीज। कळोनि आलें हें मनाला नकळे जनाला निरंजनीं हा रीज। लागोनि गेला हा सत्य हो हेचि नित्य हो निजीं लागली नीज ॥ २ ॥ उफराटा रोंक हा दृष्टीचा नाश सृष्टीचा झाला परम प्रकाश। चिदाकाशींचा दिनमणि ज्ञानकमळणी झाला परम विकाश। सद्गुरुकृपा या नाव हो महानुभाव हो ह्मणे सोहिरा दास ॥ ३ ॥

पद ५९.

आजी हा जीव ब्रह्मानंदीं रमलारे ॥ ध्रु० ॥ संदेहीं, न पडतां देहीं, पहातां विदेही, मीं हा गमला ॥ १ ॥ दिनमान, नाहीं कीं दिव्य मान, तें जें अभिमान, सहज दमला ॥ २ ॥ आंगीं चिन्हें, उमटलीं कीं पुन्हा, नये ऐसीं गुन्हा, सकळ खमला ॥ ३ ॥ जैसी सती, पति कांपती, कीं जन भूपति, तैसीं इंद्रियें जपती अमला ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा, भूतीं कीं भरला, भरोनी उरला, जवळ दुरला नकळे मला ॥ ५ ॥

पद ६०.

काय म्यां सांगो अगोचर नवल तुझें हो॥ ध्रु०॥पोकळ कर्ण, येथ नाहीं कोण। ऐकों येतें तें काई हो ॥ १ ॥ उगीचि कीं बापुडी, दिसते हे चांवडी। कठीण मृदुकस हो निवडी ॥ २ ॥ श्वेत भंवतें, काळें वरतें। दिलीसी कैसें दिसतें हो ॥३॥ तेवींचि

जिव्हेस, दिसतें हें मांस । कवण घेतो रसहो ॥ ४ ॥ नासिकिं केवळ, दिसतो अनीळ । कवण घे परिमळहो ॥ ५ ॥ देह हें झालें, ऐसें कवणिं देखिलें । शेवटीं कोठें गेलेंहो ॥ ६ ॥ यचाचा कर्ता, नगवे धर्ता । येथ तरि मर्ता कोणहो ॥ ७ ॥ सत्ता समाधान, जडा ना ज्ञान । कवणा तरी अज्ञान हो ॥ ८ ॥

पद ६१.

मन मग्न केलें गुरुनाथें ॥ ध्रु० ॥ स्वरूप कळलें, मीपण गळलें । मिळलें आनंदातें ॥ १ ॥ सहज पिसावलें, मुळीं विसावलें । पावलें मोक्षपदातें ॥ २ ॥ शून्य जितलें, निर्गुणीं रुतलें । गुंतलें निजछंदातें ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा सुलीन, होउनि तल्लीन । झालें अनाहत नादातें ॥ ४ ॥

पद ६२.

चिन्मय मोतीं हें मज आलें, देहभान गेलें । सांग काय पां उरलें, लय लक्षचि मुरलें ॥ ध्रु० ॥ सांपडला हा अनुभव, हरला भावाभाव । आपेंचि गळाली हे माव, उजळला स्वयमेव ॥ १ ॥ अवचटेंचि म्यां निघालों, कोठें नेणों गेलों । पाहातां पाहातां निमालों, सहजींच सामावलों ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे हा सुख लाभ, मिनलाचि स्वयंभ । परा प्रमदा वल्लभ, स्वयंभ आरंभस्तंभ ॥ ३ ॥

पद ६३.

कल्याण केलें हो येणें, त्याला कैंवी उत्तीर्ण होणें । सुफळ झालें हें जिणें, पुनरपि जन्माला या नाहीं येणें ॥ ध्रु० ॥ तीन्ही लोक चळती जेणें, प्रभव प्रळय तेणें । अविनाश दिधलें देणें, त्याचें रूप कैसें तें म्यां नेणें ॥ १ ॥ नित्य ज्याचें नाम घेणें, आतां कांहीं नाहीं उणें । दैन्यचि पळालें भेणें, लेइलें शांतीचें हें लेणें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणें मन वेणें, करुनि बो-

धाचें केणें । देह हें वाटलें पेणें, झालें जिवा ज्ञानगंगे न्हाणें ॥ ३ ॥

पद ६४.

सज्जन हा चुकलेला आला । दर्शनीं परम हा जीव धाला ॥ ध्रु० ॥ येथेंचि असतां दिसला नाहीं, वसला देहीं न करी कांहीं । सदैव त्याचा ध्यास वाहीं, विसविलि नाहीं हे जपमाला ॥ १ ॥ अंतर बाहेर प्रकाश पडला, मोह आंधार हा सहज दडला । विदेहपणीं कीं जिविं हा जडला, चिन्मय लाविली दिपमाला ॥ २ ॥ प्रपंच दिसला उदास सारा, अवघ्यां चाळक एकचि वारा । सिद्धांताचा सेउनि चारा, स्वच्छंदें आनंद झाला ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा चिद्धनाला, वर्षतांचि पूर आला । द्वैताचा हा पूर आला, एकचि झाला नदीनाला ॥ ४ ॥

पद ६५.

तरी अघटित हें घडलें । चित्त स्वरूपीं जडलें ॥ ध्रु० ॥ क्रोध शांतिरूपें येक होउनि । व्याघ्रधेनूसीं जहीं सख्य पडलें ॥ १ ॥ ममता भास अदृश्यीं मिळोनी । गरुड पिच्छांवरी व्याळ क्रीडले ॥ २ ॥ लोभ मद गज पंच पंचाननीं । भेटोनि रत्नें वंदीयलें ॥ ३ ॥ पूर्ण जळामध्यें काष्ठ हुताशीं । पाहे मंजळलें ॥ ४ ॥ सोहिरा निजमहींतळीं राहोनि । रविचंद्र आकळले ॥५॥

पद ६६.

निजरूपें तरी अनुभव सोपा ॥ ध्रु० ॥ कल्पना काजळी जेथ मावळे । नाहीं करी जई भवविक्षेपा ॥ १ ॥ सर्वही सोज्वळ निजतत्त्व निर्मळ । कोण धरे मग पुण्य पापा ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे ज्यांहीं हें सुख सेविलें । नाहीं तयां लागीं पुनरपि खेपा ॥ ३ ॥

पद ६७.

कळतां हें चैतन्य कां व्हावें दैन्य ॥ ध्रु० ॥ येकचि निश्चय धरावें निजलय । नाहीं तयांसीं तें कांहीं न्यून ॥ १ ॥ प्रेमामृत हें घेउनियां रत । होउनि देखीजे सर्व शून्य ॥ २ ॥ कोठें कांहीं पाहातां नाहीं । जाणोनि उगें मग ध्यावें मौन्य ॥ ३ ॥ सोहिरा निजनिधी पूर्ण समाधी । लागुनी राहे तो येथें धन्य ॥४॥

पद ६८.

आगम निगम पद सार ॥ ध्रु० ॥ पाहें न पाहिलें, सेवीं न सेविलें । जेथ वसे मनोहर ॥ १ ॥ प्रकाश प्रकाशक, नित्य नवें कौतुक । होती तीन्हीं लोक येकाकार ॥ २ ॥ तें मुख बोलतां, बोल अबोलतां । होउनि राहे सुंदर ॥ ३ ॥ शास्त्रसमूहेसी, साभासादिक । पहुडे अमरगणांतर ॥ ४ ॥ निजसुखखाणि, देख निठोरपणीं । सोहिरा ह्मणे मिळुनि असादर ॥ ५ ॥

पद ६९.

जीवलग भेटला । जीवन प्रेमें आळंगिला ॥ ध्रु० ॥ अनादि निजशक्तीसीं प्रवृत्ति संगाला । लागुनि जो मुळींचा हारपला ॥ १ ॥ समदृष्टी अवलोकुनि पहिलें उत्पत्ति गुण । हारोनि पूर्णतत्वें वोळखिला ॥ २ ॥ बाह्य नादाला सद्गदुनि आला । ब्रह्मरंध्रस्थानीं श्रवला अनाहत नादाला ॥ ३ ॥ त्रिविध तिन्ही अवस्था देखोनि चौथे तुर्य पदासी येउनि । सेजे उन्मनीं पहुडला ॥ ४ ॥ देहीं देहातीत होउनि प्रवृत्ति निवृत्तिला भावोनि । सोहिरा निजलक्षासी आला ॥ ५ ॥

पद ७०.

होतें मींचि हारलें निजधन चौथेला सांपडलें ॥ ध्रु० ॥ पहिलें निर्गुण निराकार, आलें व्यक्तीसी साकार । होतें अविद्येनें घेरिलें ॥ १ ॥ पंचविसांचे संघटीं, पंचविसां येकवटी ।

करोनि तत्पदा आणिलें ॥२॥ अभिन्नतेचे नयनीं, आपें आपणा देखोनि । आणुनि त्वत्पदीं ठेविलें ॥ ३ ॥ तत्त्वें महत्तत्वीं ठेउनि, ठेलें पांचेव लागुनि । निरुतें असिपदीं ठेविलें ॥ ४ ॥ सोहिरा ॐकाराला ठावो, नाहीं ऐक्यापाशीं गावो । सौख्य अनुपम्य जोडलें ॥ ५ ॥

पद ७१.

जग मग ठेंगणें ठेंगणें, स्वरूपीं पूर्ण होणें । अहं हें सोडुनि घेणें, सहजगतीचें ठाणें ॥ ध्रु० ॥ कर्ता करविता तो जाणें । घेई परतत्त्वाचे खुणे ॥ १ ॥ देहालागीं निराळें होणें । जीवनि जैसें कमळ आलाणे ॥ २ ॥ पाहा हें स्थूळ अस्थिर पेणें । जाणुनि ब्रह्मीं सदोदित असणें ॥ ३ ॥ विकल्पविरहित असणें । सोहिरा बोले अघडित घडणें ॥ ४ ॥

पद ७२.

निर्मूळ तें फळ सांपडलें हो जें ॥ध्रु०॥ टाळ तें मूळ कीं मूळ तें टाळ हो । यांत उलागीं अलगजें ॥ १ ॥ पाहातां ज्या फळीं अनेक फळें । येक येकांतहि येक मूळीं जें ॥ २ ॥ ज्यान्ही साहांसहि शमदमादिकां । नाकळेचि निजवर्ण निरुत जें ॥ ३ ॥ राजयोगादिकीं सेविलें आवडी । मौल्य बहुत अनुपम्य जें ॥ ४ ॥ सोहिरा फळामृतें समरुद्ध होउनि । दृढपणिं निजदृष्टी धरी जें ॥ ५ ॥

पद ७३.

पाहीं हो पाहीं । सहजगति चाले जो गोसावी ॥ ध्रु० ॥ पाहातां गृहस्थाश्रमी ऐसा भावी, स्त्रीसह वंशवृद्धि बहु ते दावी । ज्याची गोष्टी असेल त्याला ठावी, तोचीं एक पूर्ण अनुभवी ॥ १ ॥ गृहधर्म करितां सकळहि त्यागी, विषयभाग्यीं असतां

जो वीतरागी । पाप पुण्याचि चित्तीं नये विषागी, तोचि एक धन्य राजयोगी ॥ २ ॥ निजबोध हा सदैव हातीं दंड, धरोनि चाले शांतीपथीं चाड । चित्स्वरूपीं लाउनियां अखंड, ज्ञानवल्हीच्या कैफासि बोसंड ॥ ३ ॥ देहालागीं वेगळिक हेचि विभूति, लाउनि बैसे चहुं आसनाचे अंतीं । अंतर रंगाचीं भगवीं पांघुरलातीं, प्रेमालयीं मस्तकीं जटा स्फुरती ॥ ४ ॥ चतुष्पदेचे ध्यानीं जो निमग्न, तेथ झाला अवधूत अवघा नग्न । माझें मीं हें स्मरण झालें भग्न, सोहिरा पूर्णालयीं झाला हो निर्विघ्न ॥ ५ ॥

पद ७४.

वेगळे नव्हती आत्मा जीवात्मा दोघे जण ॥ ध्रु० ॥ जे ठायींच्या ठायींचि जे कां आहे, तें कांहीं केलिया डळमळ नोहे । हें जा दीर्घ दृष्टि करोनि पाहें, भिन्न भाव दाविति हे त्रिगुण ॥ १ ॥ पारंपर हें सहज दृष्टी दावी, सृष्टिभूतें रचना हे आघवी । मोठा आहे ऐसा जो लाघवी, धरोनि वर्ते संचित क्रियमाण ॥ २ ॥ निर्गुण नोहे विषया या रासिं आसक्त, सगुण योगें इंद्रियसुखीं प्रविविक्त । पाहाति ज्यालागीं योगी नित्य मुक्त, मंदमति लाविति आरोपण ॥ ३ ॥ जे जे घटीं जैसा आहे धर्म, तेथें मिळोनि करितो तो स्वधर्म । करोनि नाहीं ज्यालागीं बद्ध कर्म, मिथ्या भावितें अज्ञान मींपण ॥ ४ ॥ पाहतां दृढ अंतरदृष्टि सोहे, सर्वे जिव हा म्हणतो शिवपण लाहे । भिन्नपण कांहिं जेथ न साहे, सोहिरा बोले समरसीं निजखुण ॥ ५ ॥

पद ७५.

चिदानंदींचा ऐसा राजा, सदोदित भोगी निजभाजा । काय वानुं मी त्याच्या साजा, पाहीं पाहीं तेथील नवल वोजा ॥ ध्रु० ॥ मन हारोनि झालें मनोहर, तेचि शोभति अतिरहं-

वर। महीभ्रमणीं बोध नित्य स्वार, पंच तिसांसि येक सरदार॥ १॥ अनिज सांडुनि निज सोहंविज, तेचि डुल्लति महा मतंगज। कामधेनु दुभे दिवस सांज, रवीआगळा तेथ तेजःपुंज॥ २॥ ज्याच्या मंदिरा च्यान्ही दरवाजे, चोपदार च्यान्ही उभेले जे। शब्द निःशब्दीं मंत्री बैसला जे, अनाहत भेरी नित्य वाजे॥ ३॥ उन्मनींचें सतत ज्यासी स्थान, तेथ हारपलें देहभान। तेथ सहज निर्जी निजोन, सोहिरा झालाचि तेथ लीन॥ ४॥

पद ७६.

सद्गुरुकृपादृष्टि उघडे दृष्टी॥ ध्रु०॥ नित्य अनित्य पाहोनि, ज्यांहीं निज स्वरूपीं लय लावोनि। दीधली अवभासाचि पृष्टी॥ १॥ भवभ्रमासि हेळोनि, सर्वे निजउगमासी मेळोनी,। हरिली जीवदशेचि गोष्टी॥ २॥ ज्याचेनि निज हरीखें, सोहिरा जीव शिव हे नोळखे। ज्याला तुर्य पद समवेष्टी॥ ३॥

पद ७७.

याहुनि काय तें बोलणें। आनंदें डोलणें॥ ध्रु०॥ प्रेमभरें मन भरलें। चैतन्य हें मनांगीं आभरलें॥ १॥ असोनियां तरी जनीं। वस्ती केली निरंजनीं॥ २॥ सोहिरा पारंपर हें सांगे। दिसती तितुकीं मायासोंगें॥ ३॥

पद ७८.

ज्ञानसिंधु शिरोमणि। नकळे कवणा ज्याची करणी॥ध्रु०॥ धुंधुकार दाटे, मग तें रूप दीसें गोमटें। केली जीव पणाचीं लेणीं॥ १॥ लेणीभूषित शोभे भ्रू शीला, योगी जाणति निजवहिला। योगें तुर्यपदाचे मिळणी॥ २॥ मिळणी होतां जाणपणाला, ज्ञाता नाहीं ऐसा झाला। न दिसे ज्योती रूपासि

तुळणी ॥ ३ ॥ सोहिरा बोलणें बोलों गेला, सगुण देशीं रावो निमाला । न दिसे मागें पुढें कोण्ही ॥ ४ ॥

पद ७९.

निजीं वीण निज । नये सये वो मज ॥ ध्रु० ॥ नयना अलक्ष जें वाचें अमुक तें । तेथ परतोनि मी नये ॥ १ ॥ परेचे उपरिये पालखीं पहुडये । सहजचि घेइं आल्हये ॥ २ ॥ तेथ चौघी जणी गाति निगमपणी । तें सुख तयांसि भूलय ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मग तें सुख पावणें । चुकवणें भव हा निरय ॥ ४ ॥

पद ८०.

निजसदनीं धरीं धीर ॥ ध्रु० ॥ भव मेरु हा पृथ्वी उलथील । त्रिकुटीं राहुनि स्थीर ॥ १ ॥ विषय कोरान्न हें न मिळे तरी । सेउनि गंगेचें नीर ॥ २ ॥ रवि चंद्राविणें अंधत्व भासेल । गोल्हाटीं पेटवीं वैश्वानर ॥ ३ ॥ शोकमोहाचा पडेल पर्जन्य । प्रेरुनि ज्ञान समीर ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे अभय वोपीतां । होसील व्योमी गंभीर ॥ ५ ॥

पद ८१.

श्यामसुंदर मुरलीधर ॥ ध्रु० ॥ जीव शिव एकाकार, देखोनि स्वरूप नार । चुंबन देती दोन्ही अधर ॥ १ ॥ योगियां सतरावी ते, भावोनियां माता । जीवविती नित्य पयोधर ॥ २ ॥ भवार्क हा तात वेळा । निववितो ज्ञान जळधर ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे निजीं, निजसुखामृत । स्मरे ज्यासी शशिधर ॥ ४ ॥

पद ८२.

सहस्रदळकमळ हें सुंदर, आत्मा बैसे निज अमोदीं मधुकर । जीव शिव हे करोनि दोन्ही अधर, सेवी सत्रावीचे पयोधर । परमानंदें आनंदति योगी, सज्ञानीयें विज्ञानाचे भोगी ॥ ध्रु० ॥ जन्म मृत्याचि चुकली येरा झारी, विनटलें जें श्रीगुरु-

पद निर्धारिं । परम पद हें झालें ज्या साहाकारी, येकायेकीं पात्रलें निराकारीं ॥ १ ॥ मन हें हारोनि झालें मनोहर, भ्रमर-गुंफे घेतला पाहुणेर । त्यातीत ज्याचें निजमुक्तिचें माहेर, सोहिरा ह्मणे भावोनि हरिहर ॥ २ ॥

पद ८३.

अध शून्य ऊर्ध्व शून्य त्रिशून्य । पैं शून्य भेदोनि महा-शून्यीं गेला ॥ ध्रु० ॥ दोरा वेगळा बांधोनिया जेथ इंद्रियांचा धणी हा धरोनिया न्हेला ॥ १ ॥ त्रिकुट श्रीहठ गोल्हाटीं पैट औटपिट टाकुनि भ्रमर गुंफे आला ॥ २ ॥ वैखरी रोधोनि मध्यमा भेदोनि पश्यंति सोडुनि परेनें वरियेला ॥ ३ ॥ सोहिरा निःशब्द सुखें सुखावोनि सत्रावीच्या स्तनपाना गुंतला ॥ ४ ॥

पद ८४.

उमज दशवें द्वार । निरंतर नांदे सत्रावी नार ॥ध्रु०॥ नादाचा नाद जहीं निज । सुखस्वाद सुषुम्नेवरी होय अनाहत गजर ॥१॥ इडा पिंगळा प्राण रोधुनी । सेवीं अखंडीत वाहे आकाशीं नीर ॥ २ ॥ ककार खिडकीं उघडुनि नादबिंद भेदोनि । सुखेंचि सुख हें भोगीं [illegible]ी अरुवार ॥ ३ ॥ अहं सोहं सकट भ-रोनियां घोंट । आपेंआप निघोट निजिचि निर्भर ॥ ४ ॥ सोहिरा दास ह्मणे स्त्री पुरुष नपुंसक । विना चौथें देख हें नि-राकार ॥ ५ ॥

पद ८५.

ब्रह्मबोधें हें भुललें मन । कोठें नेणो गेलें ॥ ध्रु० ॥ देखो-नियां चिन्मात्रचि मग । तन्मय होउनि ठेलें ॥ १ ॥ माझें मीचि हें नाठवे । देहभान विसरलें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे चिर्तिसधुमाजी । सैंधव मानें किं वीरालें ॥ ३ ॥

पद ८६.

परब्रह्मचि आघवें । सुखें सुखचि हें भोगावें ॥ ध्रु० ॥ जेथ आहे तेंचि आहे, ह्मणो नये होय नोहे । संवे मीपण हें त्यागावें ॥ १ ॥ उगें होईल तें पाहावें, सोहंबीज हें जपावें । नित्य स्वानुभूतिंचि या गावें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे, भावोनि देव । तेथ कांहिंचि न मागावें ॥ ३ ॥

पद ८७.

ब्रह्मबोधें गुल्ल झालें । मन उन्मनीं रिझालें ॥ ध्रु० ॥ ज्ञानानळें भव इंधन । पोळुनि ज्ञेयचि हें विझालें ॥ १ ॥ द्वैताद्वैत हें खंडुनि । महा अद्वैत बुझालें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे चिन्मात्र हें । मग तन्मय होउनि ठेलें ॥ ३ ॥

पद ८८.

निजबोधें जाहला गर्क । जेथ तुरती हे चंद्रार्क ॥ ध्रु० ॥ पाहुं जातांचि सुखसिंधु । सैंधव मानें बुडाला तर्क ॥ १ ॥ सोहिरा ह्मणे येकायेकीं । झाला जाणीवेचा संपर्क ॥ २ ॥

पद ८९.

आदी नाहीं अंत । तोचि आपुला सिद्धांत ॥ ध्रु० ॥ पाहातें पाहाणें जेथ विसाव्या आलें । उन्मनीं रीघालें मन कीं हें ॥ १ ॥ आकाशाचा डोळा चिन्मय सर्वांगचि झाला । मज माजी देखिला नाहीं कोण्हीं ॥ २ ॥ मींचि मजला तुरें जागा दुजा उरे तेथ कैंगा । सोहिरा म्हणें हें सहज निजधर्म बुझों कीं गा ॥ ३ ॥

पद ९०.

कवणाचा कोण हा कोठील जाणोनियां नेणो कीं जी । जाणिवेसीं नेणपण लया गेलें निजनिजीं ॥ ध्रु० ॥ सत्ता जेथ हारपली माध्यानीं जैसी साउली । मन बुद्धि हे ठकलि नसोनि

जी ॥ १ ॥ नाहीं माय नाहीं बाप नाहीं रेख नाहीं रूप । रूपाचा हा स्वयें दीप न लपवितां लाविला उमजोनि जी ॥२॥ सेखींचें सुख हारपे जेथ नामरूपाचा चळथ । निरालंबीं पहुडे नाथ अरुवार उन्मनी सेजीं ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे धरोनि सोडा कल्पनेचा करोनि धोंडा । धांव घ्या महाशून्यामाजी ॥ ४ ॥

पद ९१.

परा प्रेम गुमान ॥ ध्रु० ॥ आकळ नाकळें अगम अगोचर । मना वाचे दिठी अनुमान ॥ १ ॥ सच्चिदानंद पद अव्यय । आंगींचेचि महिमान ॥ २ ॥ निराकार निर्विकार । जेथ नाहीं दिनमान ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मग सर्वभूतीं । पाहा हेंचि समान ॥ ४ ॥

पद ९२.

सहज निद्रा आपेंचि मज लागली ॥ ध्रु० ॥ उठला योग खेचर मुद्रा । लागोनि विरागली ॥ १ ॥ पुढील हे योजना मुळींच मोडली । आठवण नुरे मागली ॥ २ ॥ नारी पुरुषाविण कवण हे नेणो । निजोनियां जागली ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे सोहंरवि अस्तमानीं । न्हेली मी हेर साउली ॥ ४ ॥

पद ९३.

उन्मनीं निज सहजेंचि मज लागली ॥ ध्रु० ॥ चिन्मयें धालें पुढील विसरलों । आठवण नुरे मागली ॥ १ ॥ ब्रह्मबोधें आपेंचि हे । चित्तवृत्ति विरागली ॥ २ ॥ तन्मयदीपिका लावोनियां । कवण नेणो हे जागली ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे जागतां निजली । परतोनि ना उमगली ॥ ४ ॥

पद ९४.

परब्रह्मीं मुरलें मन ॥ ध्रु० ॥ बोध अबोध हा हारोनि गेला । सहजेंचि हें झालें उन्मन ॥ १ ॥ त्रिविध हा ताप निमाला ।

वर्षुचि लागला चिद्धन ॥ २ ॥ टाकुनि हे गुण सकळ सगुण । रूपातीत रूप हें निर्गुण ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे बोलणें निमालें । कांहींचि नाहीं तहीं झालों लीन ॥ ४ ॥

पद ९५.

मीं काय हो हें सुख वानूं अनुमान ॥ ध्रु० ॥ वाचा हे गळे प्राण पांगुळे । सहज मिळे जहीं नाहीं दिनमान ॥ १ ॥ व्यक्त ना अव्यक्त बद्ध ना मुक्त । हें निजनिजींचें महिमान ॥ २ ॥ परम प्रमेय हें अपर नापर । नाम अनाम गुमान ॥ ३ ॥ चित्रींची भिंति नसोनियां असति । तेवीं हे सबसमान ॥४॥ सोहिरा ह्मणे मी हा टाकुनि पाहा । जीव शिव अभिमान ॥ ५ ॥

पद ९६.

मजमाजी जागली हे सहजें सद्गुरुचि कृपा ॥ ध्रु० ॥ स्वात्मसुखाचा उगम मिनला । अनुभव हा सोपा ॥ १ ॥ आपणापें देखोनि ठेलें । दूरीचि पुण्यपापा ॥ २ ॥ दृश्य हारोनी दर्शनीं भरिलें । दृष्टत्वाच्या मापा ॥ ३ ॥ सकळ जप हे टाकुनि होय । जपचि हा अजपा ॥ ४ ॥ जाणीव तम हा हारोनि उजळे । स्वयंप्रकाश दीपा ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे म्यां मिनलों निवृत्ति । भुवनाचिया भूपा ॥ ६ ॥

पद ९७.

सद्गुरुचे कृपेनें झालें मनचि हें तन्मय ॥ ध्रु० ॥ दिठीचि उपरति मिठी पडोनि । मिनलें निरामय ॥ १ ॥ अपरा हारोनि परा मिळाली । सुख हें अप्रमेय ॥ २ ॥ अहं सोहं हें नुरउनि आलें । मज माजी चिन्मय ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मग वाटे आला । बरवाचि समय ॥ ४ ॥

पद ९८.

मजमाजी मींपण हें तैसें सहजेंचि हारलें ॥ ध्रु० ॥ सैंधव मन हें चैतन्यसिंधु । माजींचि विरालें ॥ १ ॥ संकल्पानळ रा-

हातां सदसद। रंग हें जिरालें ॥ २ ॥ असणें नसणें घटमठ दोन्ही। चिदांबरीं मिळालें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मग मिळोनि उरलें। आपणयां लाजलें ॥ ४ ॥

पद ९९.

न बोलवे यावरी आतां एक आणी दोन्हीं ॥ ध्रु० ॥ संकल्प त्यजुनि निवांतचि राहिलों निरंजनीं ॥ १ ॥ कवणा ठायीं तें नेणो परी मन गेलें कीं विरोनी ॥ २ ॥ आपणा पाहूं जातां कल्पना गेली हारपोनी ॥ ३ ॥ मजमाजी पडली मिठी दिठी नये हे परतोनी ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे हें चैतन्य लाधोनि सहजेंचि आलें मौन्य आपेंचि लागली उन्मनी ॥ ५ ॥

पद १००.

भवदंडित मंडित हो अखंडित तुह्मीं गावा ॥ ध्रु० ॥ देउनि तन मनमोहन गहन शांतिसुख चांगावा ॥ १ ॥ आत्मशुद्धि त्रिशुद्धि विशुद्धि स्वसमाधी मही मागावा ॥ २ ॥ त्रिकुट श्रीहट गोल्हाट भेदोनि त्रिवेणी संगमा गावा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे अपर प्रेम सुंदर परा नारिसंग भोगावा ॥ ४ ॥

पद १०१.

मजमाजी हे विकासली हो सहजेंचि साजणी ॥ ध्रु० ॥ काम हें जळ निर्गुण दिनमणीमाजी जैसी कमळणी ॥ १ ॥ आनंद प्रेम अमोदसुखीं रमे मानस हें भृंग पणी ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निश च्यारी प्रहर हें हारपति चौघी जणी ॥ ३ ॥

पद १०२.

मीचि जेथ नाहीं दुजा कैंचा तेथ ॥ ध्रु० ॥ एकाएक झालें तयीं दीन नाहीं नाथ ॥ १ ॥ आदी नाहीं अंत जातां नाहीं पंथ ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आपणापें असावें सनाथ ॥ ३ ॥

पद १०३.

बाई वो आतां काई हें मी सुख सांगों ॥ ध्रु०॥ निजी दिठी सुदलें अंजन हाता आलें । हें निजधन कवणिची विकल्प नये लागों ॥ १ ॥ न दिसे हा देवभक्त नाहींचि कीं बद्धमुक्त । कवणापासीं काय मागूं ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मज हें घडलें अवचटेंचि पडलें । स्वानुभूतीचा भागेभागू ॥ ३ ॥

पद १०४.

मजमाजी घडलें सुख हें सांगों काय सये ॥ ध्रु० ॥ आनंदें निवाली तेथचि कीं निमाली । दिठीं गेली हे परतोनि नये ॥ १ ॥ निरंजनीं रत निःसंग निर्मळ । मिनलें निर्गुण निरामय ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आतां घडणेंचि विघडलें । झालों म्यां निजिचि कीं निर्भय ॥ ३ ॥

पद १०५.

झालों हो सुख चिन्मय बाई ॥ ध्रु० ॥ भाव हरला बोध मुरला । प्रकाश उरला सांगों म्यां काई ॥ १ ॥ रूपरेखेविण मिनलें बाळक । अहं ओवाळुनि घेउं बलाई ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आतां मिळणें ओंवाळणें । हारुनि मीं मज उरलें नाहीं ॥ ३ ॥

पद १०६.

बोला आंत खोली, खोलीसवें गेली । वाचा निमाली, कवण जागा ॥ ध्रु० ॥ हा सांगें बापा, अनुभव सोपा । आपुलेया रूपा, ओळख कैसा ॥ १ ॥ ब्रह्मीं भाव हरला, मन उगम मुरला । मग उरला, कवण तो गा ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे, सांगें सखया । आपुलिया ठाया, निजतां भलें ॥ ३ ॥

पद १०७.

उन्मनी हे लागली, चित्तवृत्ति विरागली । नाठवण मागली, तन्मयेंशीं जागली ॥ ध्रु० ॥ चिन्मय सुखीं निजतांना उमगली

॥ १ ॥ कल्पना उलघली कवण नेणों भोगली ॥ २ ॥ हे रूपाविण चांगली सोहिरा ह्मणे न संगोनिया संगली ॥ ३ ॥

पद १०८.

गुरुकृपेनें आजी अविनाश सुख जोडलें ॥ ध्रु० ॥ दर्शन विदेहाचें देहाचें भान मोडलें ॥ १ ॥ पूर्ण प्रेम पिणें न कल्पिणेंचि हें सोडिलें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे शून्यचि चैतन्यीं हें मन वोढलें ॥ ३ ॥

पद १०९.

स्मरण ना मागलें लय लागलें ॥ ध्रु० ॥ नारी पुरुष नपुंसकाविण चिन्मय सुख हें चांगलें ॥ १ ॥ कवणें ठायीं ह्मणोनी पाहातां मनचि किं विरागलें ॥ २ ॥ शोधूं गेलें तहींचि न्हेलें परतोनि ना उमगलें ॥ ३ ॥ एकाविणें ना दुजेंही पुरत कल्पी तें विभागलें ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे तुज अंतर गुज हें न सांगोनिया सांगलें ॥ ५ ॥

पद ११०.

निज लागली उन्मनी ॥ध्रु०॥ अहं त्यजोनि सोहं उमजोनि राहिलों निजोनी ॥ १ ॥ पूर्णाल्हादीं आनंदकंदीं सच्चिदानंदीं रिझोनी ॥ २ ॥ निवटोनि एके निजकळिके निर्गुणभूमिके रुझोनी ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे अज्ञान ज्ञेय हें विझोनी ॥ ४ ॥

पद १११.

सुखसारसरिते । निजजनकल्पलते ॥ ध्रु० ॥ कलिमलदहनि मनमोहनि जगद उन्मलते ॥ १ ॥ अद्वयाब्जिनि चित्सुखदिनमणी देखोनिया खुलते ॥ २ ॥ मजमाजी मीपण हें तुरवुनी अखंडीत डुलतें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निज गुज बुझवुनियां निजानंदें झुलतें ॥ ४ ॥

पद ११२.

माहेश्वरी कुमारगौरी ॥ ध्रु० ॥ तनमनमोहनि गहनि तूं परा प्रेम सुंदरी ॥ १ ॥ निर्जी निज सुखसदनीं मदनीं सज्जनवन वैरागरीं ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मजमाजी सहज अर्धनटनारी ॥ ३ ॥

पद ११३.

अगम अगोचराचें ध्यान । हें त्या ॥ ध्रु० ॥ अपरोक्षवस्तूचें ज्ञान ॥ १ ॥ सर्वांचें निदान ॥ २ ॥ उत्पत्तिस्थितिलय जेथून ॥ ३ ॥ काया चाळित्या सर्वे वाळित्या ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे रूप निरंजन ॥ ५ ॥

पद ११४.

चालवितो कुडी हे तयाचि गोडी लागली ॥ ध्रु० ॥ होउनि उदास विषयांचि आस त्यागली ॥ १ ॥ विसरला आपण आठवण ना मागली ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे सहज निद्रा हे मुद्रा चांगली ॥ ३ ॥

पद ११५.

लाधलें हो अनादि निजबीज सहज मज हें ॥ ध्रु० ॥ सकळ भूप अमुप अरूप दीप ॥ १ ॥ अकुळ अगोत्र स्वतंत्र पवित्र चिन्मात्र ॥ २ ॥ अभेद बोध जगदाकंद महानंद ॥ ३ ॥ ज्याणें प्राण चळे हें शरीर खेळे तो मज मेळे अनंत डोळे ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे क्षम परा प्रेम जग नग हेम ॥ ५ ॥

पद ११६.

ब्रह्म अम्मल प्यालों उन्मत्त झालों ॥ ध्रु० ॥ आपपर विसरलों । संसारांतुनि निसरलों ॥ १ ॥ अनुभवाचा प्याला । रूपाविण देखिला ॥ २ ॥ अगोचर रसाला । रसनेविण प्राशिला

॥ ३ ॥ कैफ हें उतरेना । उतरतां उरेना ॥ ४ ॥ डोलत डोलत चालिलों । नेणों काय बोलिलों ॥ ५ ॥ झाला ऐसा चढावा । सोहिरा परे पडावा ॥ ६ ॥

पद ११७.

चिन्मयसुखेंचि आम्हीं झालों समाधान ॥ ध्रु० ॥ मजमाजि सहजेंचि देखिलें निधान ॥ १ ॥ आवडे तेव्हां भोगावें विधि ना विधान ॥ २ ॥ सोहिरा दास ह्मणे ज्ञानेंसि हारलें विज्ञान ॥ ३ ॥

पद ११८.

साजणि वो बाई धुडुं धुडुं लाग ॥ ध्रु० ॥ तुजीया अवगुणालागीं दुरावें कन्हयां । कोठें आहे गे हरी सांग ॥ १ ॥ अव्यक्त रूपीं जो नांदत यागीं । एक अनेक धरी सोंग ॥ २ ॥ निज मना वरितील तूं जरी । काय करावा वितराग ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे तूं महाकरणी बोळसिल ह्मणी । नाहीं मग हे तुझी पांग ॥ ४ ॥

पद ११९.

सये संगमीं मग बोलों नये ॥ ध्रु० ॥ उत्पत्ति आगम जेथिल तेथचि । मिळोनि गेलें मग तूं मीं ॥ १ ॥ देह विदेह हें नाहीं जयाला । काय किती सांगों मी ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे जहीं आहे निरामय । नव्हे ते एकहि भामी ॥ ३ ॥

पद १२०.

मग पाहिलेंचि नाहीं ज्यांहीं हो ॥ ध्रु० ॥ दृश्यपणें तरी होय कीं नोहे । ज्ञान वसे बोलिला हो ॥ १ ॥ दृष्टालागीं जो देखे निरंतर । ज्ञाता निःसीम लाहो ॥ २ ॥ दर्शन ज्ञयते आठ आठव । हारोनि नाठव आठवला हो ॥ ३ ॥ सर्व सुखामृत होउनियां रत । सोहिरा निजीं निजला हो ॥ ४ ॥

पद १२१.

मी मज देखिलियारे मग नाहीं श्रम ॥ ध्रु० ॥ मीं तूं हें जेथचि निरसुनि गेलें । कैंवि उरे भवभ्रम ॥ १ ॥ श्रुतीसि अगोचर तूं तूं भेटसि । कोण धरे मग नेम ॥ २ ॥ शब्द सा जीव धर ब्रह्मीं मिळाला । कोण करे उपक्रम ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे जगीं जो अपरापर । निजदेहीं परब्रह्म ॥ ४ ॥

पद १२२.

मीं मज टाकुनि आणिक पाहूं काय ॥ ध्रु० ॥ निशिदिनीं गोरस पूर्ण वो रस । सेवनीं जो प्रीति लाय ॥ १ ॥ काम निःकाम जो जाणोनि पुरुषा । प्रकृति लावी झुलाई ॥ २ ॥ बोबडेपणीं बोलें सबोल । शब्द रूपें परे लाई ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निशिदिनीं ध्यातां । नाहीं विषयसुख लेखा ॥ ४ ॥

पद १२३.

ज्या मनानें निर्जी भोगियलें सुख ॥ ध्रु० ॥ मजमाजी मीपणा नुरेचि देखणा । सर्वे हरिलें भवदुःख ॥ १ ॥ मूर्तीतीत अमूर्त परात्पर । भावोनियां तें आलेख ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निज हेंचि काज । देखोनियां तें अदेख ॥ ३ ॥

पद १२४.

काय म्यां सांगों अगोचर नवल तुझें हो ॥ ध्रु० ॥ पोकळ कर्ण, येथ नाहीं कोण । ऐकों येतें तें काई हो ॥ १ ॥ उगीचि कीं बापुडी, दिसते हे चांवडी । कठीण मृदु कस निवडी हो ॥२॥ श्वेत भंवतें, काळें वरतें । दिठीसी कैसें दिसतें हो ॥३॥ तेवींचि जिव्हेस, दिसतें हें मांस । कवण घेतो रस हो ॥ ४ ॥ नासिकिं केवळ, दिसतो अनीळ । कवण घे परिमळ हो ॥ ५ ॥ देह हें झालें, ऐसें कवणि देखिलें । शेवटीं कोठें गेलें हो ॥ ६ ॥ य-

याचा कर्ता, न गवे धर्ता। येथ तरि मर्ता कोण हो ॥ ७ ॥ सत्ता समाधान, जडा ना ज्ञान। कवणा तरी अज्ञान सोहिरा ह्मणे हो ॥ ८ ॥

---

४. हिंदुस्थानी पदें.

पद १.

इंद्रियसें निकल गया मगन हुवा मन ॥ ध्रु० ॥ रूप रेख नहीं उनकुं मिले निरंजन ॥१॥ अनुभव हटका बनियां सब दुनियेंका लालन ॥ २ ॥ उनकी चर्या बडी तुर्या औरतसें खेलन ॥ ३ ॥ कहत सोहिरा जलाल उनका महाल योग गहन ॥ ४ ॥

पद २.

दियाबे तो दिल दान, फकीरा दियाबे तो दिल दान। लगी तो लगन गगन बानमें मगन में मस्तान ॥ ध्रु० ॥ नाद नहीं बिंदु नहीं और ज्योति कला एकला। तखियामें बैठे तो गर्क भये ज्याहां वाहां करे गुजरान ॥ १ ॥ अलखमे दोनो गये तो पलख खब गया खलख। हकीमबीनसो हुकुम क्या करे सुरत है सुलतान ॥ २ ॥ कहत सोहिरा देखो अमरिा गैब पडे बाच्छाई। त्रिकुट अलंग उपर पलंग पलंगमें पडे मलंग बाबु ॥ ३ ॥

पद ३.

अजरामर साहेब मेरा। मैं नमाज करे हुकुम तेरा ॥ ध्रु० ॥ उनका नाम मुखे मैं गाऊं, तब संसार मैं फेर न आऊं। दसवे द्वार सदर पर जाऊं, मुझमें बैठ रहे दरबारा ॥ १ ॥ जो कुई भक्त बछा धेनु, जो कुई मुं बिन बजावत बेनु। जो कुई बिराजत रेनु, मुदित मुदारा ॥ २ ॥ जिनने मनपर मान्या मेख, तांकुं रूप नहीं वे रेख। सब दुनियामें व्यापक एक, बडि

दिलदारा ॥ ३ ॥ शून्य भुवनमें गाज्या, आपहि मग्न रहे मन राजा । कहत सोहिरा बाजत बाजा, दिन श्याम नगारा ॥ ४ ॥

पद ४.

गुरुनें बंद किया वो नव दरवाजे ॥ ध्रु० ॥ तनका चोर अहंमुवा, दिल खुष हुषार हुवा । अविनाश बख्त बडा तख्त, निरंजन बनके राजे ॥ १ ॥ अलख देख्या ध्यानमें, चौफेर मैदानमें । दसवें द्वारके गुमानमें, हमेस नौबत बाजे ॥ २ ॥ ग्यानका अंश लेकर हुवा, परमहंस रहे तनका । भेदमें शंकुं कोहि, लगावना लाजे ॥ ३ ॥ मुद्रा लगी अंतकी, आदनाथ पंथकी । सोहिरा कहे बोधके, पिवे गुल्ल गाजे ॥ ४ ॥

पद ५.

देखोबे अवधूत गैबी, निरंजनीं निर्गुनवाला, पिवे प्रेम प्याला, शब्द सद्गुरु सुरत चेला, सब घट व्यापक है अकेला ॥ ध्रु० ॥ काया पूर शाहारके नव गलिया फेरीसें आया, ज्योग जुगुतके बढे अवलिया, पुकारे सहज पवनसें नव नाडीके नलिया, भ्रम्हीं बेठे जब भवरा कमल कलिया ॥ १ ॥ उलट पंछी पंथसें चलना, तीन्हीं संधी मिलना, गगनमंडलसें जब दम खाना, फेर आंखसें दिखनेकी बात कहेना ॥ २ ॥ नही वे बोधकुं आवना ज्याना, रहे दिल दरम्याना, निर्वाला रहनी जब आत्माना, हरघडिमें आनंद अम्मलमे झुलना ॥ ३ ॥ कहत सोहिरा कछु नहीं बाकी, मेहरबानी इयांकी, तनमें कछु चिज नहीं वहमाकी, उनके वास्ते जब अब यादकना थाकीं ॥ ४ ॥

पद ६.

गुरुबिन नहीं आवत ध्यानारे । परदेशी गारुडी ॥ ध्रु० ॥ निराधार मो पैदा किया पवन पानी अस्माना । अभ्रक अखम

अनंग बनाई धरती भेक भुल ज्याना रे ॥ १ ॥ कहत आपसें सुनत आपसें आपसें चलत मयाना । आपसें रसना छकर छकर सब बास उठावत घ्राणारे ॥ २ ॥ औरत रंग रसाल सलावत रती भेट पर ध्याना । दिवान होकर पीसें लागत है पुरुख बडा मर्दानारे ॥ ३ ॥ इत्ता दिखावे इत्ता छपावे अजब नजरबंदखाना । कहत सोहिरा झुट साच सब दिलकुं दिया दरम्यानारे ॥ ४ ॥

पद ७.

यहि हरमदके उपर झमके गये गैबनाथ ज्योती ॥ ध्रु० ॥ एक घडी मनकुं देना, नयनमें आल्लख लेना । उनके वास्ते कायकु होना पोथी ॥ १ ॥ उनका ध्यान करत नहीं, दिलमें ग्यान रहत नहीं । और अपनें नसीब मुफत दुनियां कायकु रोती ॥ २ ॥ उनका सील नहीं मान, भर पुरावे अस्मान । बिचमें खब गया दिनमान, काया शिंपीमय है मोती ॥ ३ ॥ सोहिरा कहे ज्याहासुं आवे, ताहांमो तो तुर्त ज्यावे । सहज समाधी पावे, साधु उन्मनिमें सोती ॥ ४ ॥

पद ८.

तुम अच्छा हुका पीना ॥ ध्रु० ॥ ब्रह्मरंध्रमें त्रिकूट चिलीम । प्राण अपानसें दम्मपर दम्म लेना ॥ १ ॥ अलख तमाखू ग्यान अगनसें । जलकर मायाधूर छोड देना ॥ २ ॥ कहत सोहिरा संतसंग धरना । अहंमलीसें नली खलील कर देना ॥ ३ ॥

पद ९.

दौलत देख दिवाना मेरी । अपना मौज न करना फेरी ॥ ध्रु० ॥ कोई दिन बनियांके दुकान । कोई दिन पर्वतके ठीकान ॥ १ ॥ तनके करत कारभार । हमारे छत्तिस खिजमत-

गार ॥ २ ॥ मनपवनकी पागा । सोहंपिलखानेकी जागा ॥ ३ ॥ करम कारखाना । हमारा नशीब जामदारखाना॥ ४ ॥ जब सोहिरा तख्तपर बैठे । तब सब दुनिया लंडपर बैठे ॥ ५ ॥

पद १०.

दिया हे निजधन लिया हे तन मन । लगन गगन पर मगन हुवा मन ॥ ध्रु० ॥ अनाहत डंका बाजे, दसवे द्वार सदरके राजे । गैब निरंजन ॥ १ ॥ निरालंबका माहाल, सब दुनियेका लाल । सब अरद नारका खेल, देख अच्छा यो जाबत ॥ २ ॥ अहं मुवा अब सोहं हुवा, तब प्रेम पिवा । मैं सोहिरा कहे ज्यान ॥ ३ ॥

पद ११.

ज्योरू लडकेनें क्या करना । दिलमें गुरुपद रखना ॥ध्रु०॥ जीवित अपना कहेंगा । तो मटीमें मटी रहेंगा ॥ १ ॥ धन तो बहुत पडया खोलीमें । बखतकुं कुच नहीं झोलीमें ॥ २ ॥ पेटमे खजमतसे कर अल्लम । काहांसो पटे हुवा नहीं मालम ॥ ३ ॥ जब मुटती नहीं वासना । तब फेर जनमकुं आना ॥४॥ सोहिरा करार करेगा दिल्ला । बडी जोडत साहेब अल्ला ॥ ५ ॥

पद १२.

लगी मेरा मनमें प्रीत तेरी । तन मन धन उसें बलहारी रे ॥ ध्रु० ॥ ग्यान कमलमें, बोध अम्मलमें । ज्योती कमलमे, अलमश न्यारीरे ॥ १ ॥ दृश्य न आउंगी, अदृश्य रहुंगी । क्या कहुंगी, उनकी बडी दिलदारी ॥ २ ॥ जलकी मच्छी, और गगनको पंच्छी । सुरत अलछेकी, अछी प्यारी ॥ ३ ॥ कहत सोहिरा मगन, रहे मैं ज्याहां ताहां । सबसें ज्याके, पग बीन फेरी ॥ ४ ॥

पद १३.

बैठा रे तो फकीर। अपनें बंगलेमें बंगलेमे ॥ ध्रु० ॥ जिननें दंगा, उतना मंगा, जल बील गंगा, गयी विहंगा। उड गयी अस्मानसें निर्गुण जंगलमें॥ १ ॥ हाठ छोडकर, लगट बाटला, घांट चढेंगा, पवन फाटका। त्रिकुट श्रीहट दो उलट कर गोल्हाटमें ॥ २ ॥ ये भिस्मल्ला, रहीमान मुल्ला, हजरत मौला, जगत जुलाला। मत कर दिल्ला अल्ला रखता नजरमें ॥ ३ ॥ कहत सोहिरा, देखो अमीरा, मिले गौवाका, दुध दुध पिया। और मग्न हुवा राव रंक नहीं नजरमें ॥ ४ ॥

पद १४.

परबत पर किल्ला, तुम ऊपर करो हल्ला। उलट पलख चाल तेरी फत्ते करे अल्ला ॥ ध्रु० ॥ गनीमकी फौज बढी बैठे घरबारी। काम क्रोध लोभ मोह बडे धनक धारी ॥ १ ॥ दस बुरूज बांके न व्हाकीब धारी। मच्छरसें वहमा बदलाम्की दोरी ॥ २ ॥ यम नेम कर्ते ज्याव अछी मोर्चेबंदी। ज्योग ज्युगत धीर बढे बीर धार बंदी ॥ ३ ॥ चोर मेर ले बातमी पाखांड रस्तखाना। पवनाके मारो फत्तसे लगाव तोफखाना ॥ ४ ॥ ग्यान ध्यान तोफमें तो आंचदेना दारू। बैराग्य बत्ती लगा देना सरबत्त का मारू ॥ ५ ॥ व्यतीरेक गोला अन्वांकी रजगिरी। हरदमसें करते ज्याव बढे मारगिरी ॥ ६ ॥ कोही मुवे कोही रुवे जरदस्त हुवे सब। जोगराज ताविनसें खोल देना तब ॥७ ॥ हस्तगत किल्ला हरखत रहील्ला। तीन्हो लोक आप हुवे अम्मलका जिल्हा ॥ ८ ॥ मर्दुमी बढी सलाबतका अगाज तो करना। दस नाद अनाहत नौबत बज्यावना ॥ ९ ॥ अस्मानमें तो लाल बढा निशाण लगावना। येक बार ज्याना तो फेर नहीं आवना ॥ १० ॥ तरुतमें तो सरुत हुवा बस्त लूट फन्हा। सोहिरा हुवे खुप हुवा गैब अलमपन्हा ॥ ११ ॥

पद १५.

फकीरा हरदम प्याला पीव ॥ ध्रु० ॥ झुट फकीरी देख तुमारी, कायकु करना भेक। भूकके खातर मंगत भीक, वे कांहां मिले रोटी घीव ॥ १ ॥ बोधकीं भंग करे बदरंग, तुम चंग हो फिकर दंग। झुल मतंग तुम जंग, हो पीर पैगंबर जीव ॥ २ ॥ हरकत हिल्ला छोड दे दिल्ला, मिल जावे साहेब अल्ला। भिस्मील्लाके गैब गुहामें, अमी को बरकत झींव ॥ ३ ॥ जोग जुगतकी कमाई च्याहीये, जीवका हुवे शीव। कहत सोहिरा तन बिन देखे, आपकुं आप चिरंजीव ॥ ४ ॥

पद १६.

तेरे बिनबिनहीं और मुद्र अवकया कहु मेरे या खुदा। धीर बीर कोहि पीर पंगंबर दगा न किया खुदा॥ ध्रु० ॥ घस्त ग्यानकी दस्त महालमे मस्तहालमें ख्यालमे। दिल बंदकर फंद छोड बिलंद अंध जंजालमे ॥ १ ॥ तेरे दास होकर आस करेंगी भवबंध पाश खलापकी। हे तमाम दमामा बाजत नौबत है यखलापकी ॥ २ ॥ बाट जंगलकी घाट त्रिकुट उलाट मन मैदानमे। औठ पीठपर पैठ पैगत उडत पंछी निदानमें ॥३॥ धरत्री छोड जल पवन छोडकर दहन धुंडत दर्म्यानमे। पांच पंचकी फौज काटत मौज लगत अस्मानमे ॥ ४ ॥ अदल-शाकी सब भदलशा तो ज्याकुं हिंदु कहतहै पाहि माम्। एक-बिंद अबिंद करतरमाज नमाज तो या ईमाम ॥ ५ ॥ ये मशार हुषार होकर ले मशाल खुशालकी। कामक्रोधका शीस काट बकशीस ले बे दुशालकी ॥ ६ ॥ अवल कोही नहीं बात सुनत कुरान पढत किताबसें। अरथमोलपर भरम खोलकर यांहासें निकल सितावसें ॥ ७ ॥ सख्त होकर शून्य तख्तमें गैब वख्त दिये किल्ला। कहत सोहिरा बारोबार तुं लवाज कहु तेरे या अल्ला ॥ ८ ॥

पद १७.

दिल मेरा आराम पाया। भगवानसुरत सब जमीन अ-स्मानमें नजरमें आया॥ ध्रु०॥ मृगजल माया उनने बनाया। झुटी काया क्या जानो मैं कब मर जाया॥ १॥ इबरत लाया पवन कमाया। दश नादोंकी छिंगी बजाकर आलख जगाया॥ २॥ कहत सोहिरा खुदा मिलाया। उनने फरमाया निर्गुन गाया निरालंबकी लगन लगाया॥ ३॥

पद १८.

मानस मेरा मगन करे जो तब देखो राम॥ ध्रु०॥ अजब नजबसें झुटा सबसें लग्या चित्तमों छंद। ग्यान विग्यानसें आया मेरी सूरत घनश्याम॥ १॥ प्रेम अमलकी चढन चढाई कुडमे उनकपार। आखन देखना बढा ज्याम॥ २॥ रंगनंगमे ज्यो-रा होकर जेह सोज्या निनार। मरदनारका हुका देखे सोहिरा दीनशाम॥ ३॥

पद १९.

दुनियांके हरहुनार देख सुरत सब नबी रतनपर जडित जवा बनवा॥ ध्रु०॥ उलट पलखपर दर्शन लेकर आधा चंद्र चुवा। वहम धरम कोही गरम नरम यहि सबका दरद मुवा॥ १॥ नादबिंदके उप्पर दो हति अनाद गेब गवा। ऊर्ध्व शून्यमें दील-मु उगारत अमृत क्षीर पीवा॥२॥ कहत सोहिरा नैनोमे देख्या तीन्ही लोककी हवा। जल थल पवना गगन छोडकर लगन-मे मगन हुवा॥ ३॥

पद २०.

मेंढा दिल नैनो रहैन जाना। अरस परसपर घन बरसत दीन दरश हुवा॥ ध्रु०॥ ईर्षीका नहींबे किसका बैठत दिलकुं नहीं हिसका। जिसका चिरा खल गावे अंदर न विने करनी

दवा ॥ १ ॥ देखत है तो भेक तऱ्हांके मुलुक रमते हवा । फकीर हुवे अम्मल पिवे देवे सब दुनियाकुं दुवा ॥ २ ॥ कहत सोहिरा घटघट अल्ला अमीका बरखत लीवा । जल थलमे वोही साहीं देखत हम्मेश खुष हुवा ॥ ३ ॥

पद २१.

मुंडे हुषार हुषार, हो खबरदार, देखो अलम बडा सार । कछुतो करामतसें होना सांईंका बेय्यार ॥ ध्रु० ॥ अबे मुंडे चप, सब तो झुटा तेरा जप, और भला बुरा खप । अस्मानके खैर म्याने दर्म्यानसें छंप ॥ १ ॥ अबे मुंडे ना लेले, ते हिजडिका झाल, तेरी खफर खुफर चाल । ज्याहांका ताहां सब तो रहे अखेर तेरे हाल ॥ २ ॥ अबे मुंडे चट, सब इस्का करो गट, और घुसा करो मट । आशापास छोड मुंडे तेरा जम करेंगा लट ॥ ३ ॥ अबे छोडबे मुंडे फंद, अछा होना लंगोटबंद, क्यौंबे हुवे अंध । उपर म्याने दोनो रहना झुलतानमें चंद ॥ ४ ॥ अबे मुंडे लाल, बढे मगन मस्तवाल, ज्याडा ल्यावे बालोबाल । अलख म्याने खलख देखो खुदाके तो ख्याल ॥ ५ ॥ सटबे मुंडे सट, खडे दुनियांमे नट, निकल चेस्मुका झट । सबही हंसमत तस्बीरीका धर्ती देखो पट ॥ ६ ॥ अबे मुंडे चंग, ज्योग ज्याहालमकी भंग, पीवो पढो दंग । जबहु देख्या तबहु होना खुषालीका रंग ॥ ७ ॥ अल्ला कांहा खोद, मुंडे काट कामक्रोध, हरदमसें करो ज्योद । और कांहाहि बैठ कौन क्या करेंगा बेटीचोद ॥ ८ ॥ झुल्लबे मुंडे झुल्ल, तुम तो आपने दिलमें खुल्ल, देखो भवनदीका पूल । अल्लानें क्या कमति कीया कबै करेंगा गुल्ल ॥ ९ ॥ सोहिरा कहे खाक, मुंडे दिल्ल रखो पाक, देखो शून्यमें चिर आंख । हुवे मुवे क्या मदर आदमी लाखोलाख ॥ १० ॥

पद २२.

आव गगन माहालका राजा, हरदम अनाहतका बाजा, दिन शामसें गाजा, आप सुरत सों सोज्या ॥ १ ॥ आव निरंजन तख्त बडा, बख्त मनका राऊत पवनका घोडा, अगमकी चलन, निगमकी रहन ॥ २ ॥ आव धरतीका पाया, छोडकर माया, ग्यानकी गया, मगन भया भूपका भूपाल, सब दुनियांको लाल ॥ ३ ॥ आव बिवेक पंजी रंका राम, तुर्या उनका हराम, आप आपसें आराम, ग्यान ध्यान तीरथसें अस्नान ॥४॥ अमृत अनुभवका पान, भगत उनकी भान, समाधके पेटमें पैदा, संत उनका बेटा ॥ ५ ॥ आव प्रेम उनका गाजा, बिन पांवसे माज्या, नहीं घेत लाजा, एकछत्र उनका राजा ॥ ६ ॥ आव निगम जलका माशा, सब अलमका तमाशा, खाने पीनेकुं उनकी खुजरत, दीलालका साही हजरत ॥ ७ ॥ आव ज्योग पंछीका फल, मुमुखकी जपमाल, अनुतापका तप, अजपका जप, नादाबिंद कला जोत, उनकी तलब ॥ ८ ॥ आव आनंदका अजब, नजरका नजब, सब इंद्रियोंसे न्यारा, कहत सोहिरा, सोहं माहाल हमारा ॥ ९ ॥

पद २३.

हजरत प्यारे खुदा हमारे । क्या करेंगि हाल ॥ ध्रु० ॥ अस्मान जमिन पर कछु नैदेखो । नैनमें नैन उज्याला ॥ १ ॥ मीठा लागत है छुटावे तनका क्याकु बनाया महाल । हिस्का लगावे उसपर कब क्या जानों लिजावे काल ॥ २ ॥ पग पंज्या शिर पैदा कीयें क्याकुं उठाया बाल । दरद दिये तो बढे बढेकुं कोही पावेंगा न्याल ॥ ३ ॥ पेटके अंदर अगन किया तुम भरभर कितना काल । एक वखत भरपुर किया तब फेर फेर हुवे खाल ॥ ४ ॥ अजब तुह्मारा ।
भरजोवनमें अछा लगत है बढे ज्योरुके ख्याल ॥ ५ ॥ कहत

सोहिरा पीछें लगा दीये कायकुं सब जंजाल । बैठ न ज्याती नजर न तुमपर दिल्ल नहुंगी लाल ॥ ६ ॥

पद २४.

और कोन करे भजन जन ॥ ध्रु० ॥ दिल मेरा बीसरो अपने बिचमें । सब झडति लेइलपजन ॥ १ ॥ सबकि करामत उनके पास । संग बसंग सब कारण मन ॥ २ ॥ गय जनमका सांच्या तोवडा । सो धन नर कोही मग्नुमन ॥ ३ ॥ तीहीं ग्राममें घट मटमें रहता । कीसें मालम भगवान ॥ ४ ॥ म्लेंछ बातसें ग्यान बताया । सोहिरा करे तेरे ध्यान ॥ ५ ॥

पद २५.

भगवानके बंदरे बाबु ॥ ध्रु० ॥ ऊर्ध्व बनमों अगम होकर । अनाहतके नादे रे बाबु ॥१॥ ज्योग जुगत गज्यागता ज्यागी । अंतर आनंदे रे बाबु ॥ २ ॥ अजब नजब संसार झुटा । छोड्या सब धंदे रे बाबु ॥ ३ ॥ सोहिरा कहे माहा शून्यमें । रहता लग्या उन्मनि छंदरे बाबु ॥ ४ ॥

पद २६.

आहारे ज्योगी ऑलख अवधूता ॥ ध्रु० ॥ बिवेक बैराग्य दोरा खु अजब तांगडिया । निरंजनकी बस्ती कीये घढा गोदडिया ॥ १ ॥ मूं बिन बज्यावे सुनो कमत नाद होंगी । मनवे भुल गया अछा अनाहतसींगी ॥ २ ॥ तन्मयकुं दिया लिया पीया अर्धचंद्रा । चिन्मयका उलटा ज्योग खेचर मुद्रा ॥ ३ ॥ औरत बिवरत कोहि नहीं उनका बाल । आप बिन बात नहीं आगेंचि अछा लाल ॥ ४ ॥ सब तमासा छोडकर न्हाटचा संसार झुटमे । त्रिकुट श्रीहट उलट बैठ गोल्हाट मठमे ॥ ५ ॥ औठ पीठ समाधमों भ्रमर गुंफका बासी । पर्तबीवबे नहीं निरालंब संन्यासी ॥ ६ ॥ ग्यान गंगा तीरथ पंछी पंथ चिदांबर ।

दशवे द्वारकुं निद्रा किये नाथ दिगंबर ॥ ७ ॥ नाद बिंद कला ज्याके तनकी बिभूत । रूप नहीं रेख देख ज्यागति ज्योत ॥८॥ आवता ज्याता पुरुख नहीं लग्या पैशूनता ! आपने खेलसें खेलता सोहिरा कांहिंचि न सूनता ॥ ९ ॥

पद २७.

प्रेमके पूर गगन ॥ ध्रु० ॥ लगी लगन ग्यान अमलसें हुवा मगन ॥ १ ॥ सोहिरा कहे ब्रह्मरंध्र मो गैब मन पवन ॥ २ ॥

पद २८.

अलख अलख कर फेर जोगी अउटकर बनी । नगरामे निज मठकुं ज्यानें कुबिचार करे मनी ॥ ध्रु० ॥ नादबंदके अचल चित्तकी कोपीन लगावे । शब्दैरि बैरागीं पिचक करवा भूत चर्चावे । अवधूत नामें श्रवनि अछा मुद्रा बतावे ॥ १ ॥ अहं फाट कर कफनि कर कर आंगीं चढावे । भाव भक्तिके झोली कर कर बिचमे रखतावे । सबके समता बंदुनि शिरपर छया बतावे ॥ २ ॥ बिनीत बंदन करी जो तेरे जोडुनि करकमल । मेहरबानीसें करी जो मेरा चित्तके गंगाजळ । कहत सोहिरा ॥ ३ ॥

पद २९.

घरी आये वो ज्यान नंदनंदनबंदनकी ॥ ध्रु० ॥ याहि गुन समज्य करे सोभावा बराना और सब नरकुं भ्रम भुलीं करकर काल ज्यावे ॥ १ ॥ सुरत सबाहे देखबि तनसें बैस समज समजावे ॥ २ ॥ प्रेम प्रीतका देखनवाला श्रीगुरुका प्रसाद सोहिरा सहज अंतर गावे ॥ ३ ॥

पद ३०.

मोरा घर मोयेहि जुग ज्याग रहींरे ॥ ध्रु० ॥ झंझा झणझणण जे बिना नागर नार नाचत गावत जब कहींरे ॥ १ ॥

आढल जंजीरमे बखत नि बैठ्या, फेर आवत कीं बात नहींरे ॥ २ ॥ तलपत प्रेमके नदीयां बाहात, हर बखत देखत सोहिरा गहीरे ॥ ३ ॥

पद ३१.

परवत परवत मैना खडी ॥ ध्रु० ॥ विनपंख पखवा विनपंख चंचु । बाजिकी लगी लगत नैनो बडी ॥ १ ॥ अलछ पछीनी सुभसें लखनी । असीं तो प्रीत मनमें जडी ॥ २ ॥ कहत सोहिरा मर्द मर्जीका । इत कोय भेद जानत विरला गडी ॥ ३ ॥

---

५. विविधविषयक प्रकरणें.

अभंग.

(१)

स्थूल कोणीं हें हो केलें । तेथ माझें मन गेलें ॥ ध्रु० ॥ चलत्याची अनावडी । चालवित्याची आवडी ॥ १ ॥ नाशिवंत नाठवतें । अविनाश आठवतें ॥ २ ॥ मधलें कोणासी पडलें । आदिअंतीं लय जडलें ॥ ३ ॥ हाता आली तत्त्व भीती । जगत्री ते उठति किती ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे कींरे ऐसें । अंतःकरणचि झालें तैसें ॥ ५ ॥

(२)

ऐशी अव्यक्त हे भिंती । विश्वा चित्राकारें मिरवती ॥ ध्रु० ॥ अहंब्रह्मास्मि हा चुना । काढुनी लेपें योजिली नाना ॥१॥ पंचभूतांचा हा रंग । भरोनी प्रकृति हें अष्टांग ॥ २ ॥ कल्पना हे चितारिणी । करी नामासारिखी रेखणी ॥ ३ ॥ लेप उमटती जाती क्षय । परी क्षिती हे अक्षय ॥ ४ ॥ भिंती नाहीं आदी अंत । हाचि योग्यांचा सिद्धांत ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे लेपाचा पसर । मोडिल्या भिंतीचा पडे विसर ॥ ६ ॥

(३)

ऐसी राऊत राहाटी । बैसे मनपवनाचे पाठीं ॥ ध्रु० ॥ घे-उनी विवेक भालेकाठी । लागे भेदाचिये पाठीं ॥ १ ॥ आंगीं वैराग्य चिलखत सुये । लागों नेदी द्वैताचा घाय ॥ २ ॥ शांतीचें हें ठेवुनि जीन । वरी घातलें आसन ॥ ३ ॥ धरी शम दम लगाम । अन्वयें व्यतिरेक सुगम ॥ ४ ॥ धारणेचा हा चाबुक । धरी षट्चक्रांचा रोंक ॥ ५ ॥ सोहिरा आधारीहुनि भारी । निघे ब्रह्मरंध्राभीतरी ॥ ६ ॥

(४)

स्थूळ नव्हे आमुचा देश । केला परेपरता वास ॥ ध्रु० ॥ येथ नाहींचि कांहीं काम । वळखिलें निजधाम ॥ १ ॥ निरा-लंब घरा । रिघालों दशव्या द्वारा ॥ २ ॥ अभ्यासाचे संगें । आलों सुषुम्नेच्या मार्गें ॥ ३ ॥ इडापिंगळा टाकिली । निज समाधी लागली ॥ ४ ॥ अनेकत्व ना अवलोकीं । दृष्टी मिळाली हो एकीं ॥ ५ ॥ उघडिलें ककार मुख । सोहिरा ह्मणे आह्मी आलेख ॥ ६ ॥

(५)

मुद्रा लागली खेचरी । परतुनि नये चराचरी ॥ध्रु०॥ स्वानु-भव वनीं । स्वसुख सहज निरंजनीं ॥ १ ॥ टाकुनि सकळ लक्ष । आजि हे अलक्ष ॥२॥ मनबुद्धि ना गोचर । ऐसी अगम अगो-चर ॥ ३ ॥ अहंकार हा समूळ । जाउनि सांपडलें मूळ ॥ ४ ॥ सर्वांचा आरंभ । विकासला निरालंब ॥ ५ ॥ महाशून्यीं करोनि वास । ह्मणे सोहिरा उदास ॥ ६ ॥

(६)

आह्मी परब्रह्मीचे भाट । जगा दाऊं मोक्षवाट ॥ १ ॥ आत्मा साहेब येतो घरा । दृश्याहूनि परते सरा ॥ २ ॥ वै-

राग्य हें चोपदार । मागां विवेक सरदार ॥ ३ ॥ योग भालदार हाकाटी । मारी नियम वेत काटी ॥ ४ ॥ मनपवनाचा हा थाट । सोहं बोध हा गजघंट ॥ ५ ॥ अनाहत घंटा गळां । नादब्रह्मचि हा आगळा ॥ ६ ॥ ज्याचे इंद्रिय ग्राम तपें । भजनाचा कारभार झेपे ॥ ७ ॥ जेथें तन्मय प्रधान । चिन्मयराज विराजमान ॥ ८ ॥ सोहिरा ह्मणे भाटविला । अवघा अनुभव आणिला ॥ ९ ॥

(७)

गुरुकृपेचें हें देणें । समाधान केलें येणें ॥ ध्रु० ॥ पावविलें ऐसें खुणे । जेथ येणें नाहीं जाणें ॥ १ ॥ सुखें आंतची डोलणें । प्रेम नयेचि बोलणें ॥ २ ॥ निका तुटला भेदाभेद । जाहाला सहज आनंद ॥ ३ ॥ विकासलें निरंजन । उन्मळिलें हें लोचन ॥ ४ ॥ मना नाहीं हो संचार । ऐसें अगम अगोचर ॥ ५ ॥ नाम रूप नाहीं ज्याला । ऐसा गैबची हा प्याला ॥ ६ ॥ मज बैसविलें स्वस्त । जेथ उदय नाहीं अस्त ॥ ७ ॥ पडे मेघाविण पाऊस । चांदणेंविण प्रकाश ॥ ८ ॥ परमामृत पारणें । मज झालें सोहिरा ह्मणे ॥ ९ ॥

(८)

संकट निरसीं गा जगदीशा । हेचि मज तुझी आशा ॥ ध्रु० ॥ हरीं या मनाच्या किल्मीशा । दावीं स्वयंप्रकाशा ॥ १ ॥ सर्वहि तुझा तूंचि ईशा । परी व्याकुळ हे जीवदशा ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे हो विशेषा । या पुनरपि नयें देशा ॥ ३ ॥

(९)

तरी धन्य ते संसारीं । इंद्रियें वळती जे माघारी ॥ ध्रु० ॥ वृत्ति नेति त्रिकुटावरी । मिळोनि जाती निराकारी ॥ १ ॥ मी हा कोण ऐसें पहाती । तटस्थ होती नेत्रपातीं ॥ २ ॥ जे

जिवंतचि मेले । मरोनि पुढती जिवे झाले ॥ ३ ॥ उदो नाहीं अस्त । तेथ झाले समाधिस्थ ॥ ४ ॥ तयां कैसें हो गणावे । देव कीं मानव ह्मणावे ॥ ५ ॥ डोळां आलिया कवळ । चर्म दृष्टीं दिसतें स्थूळ ॥ ६ ॥ त्याची घ्यावी पैं कळाची । काया जाणावी मृगजळाची ॥ ७ ॥ अवयव आनंदाचे । जे अंकुर चैतन्याचे ॥ ८ ॥ सोहिरा ह्मणे मी हो पाही । जया मीपण उरलें नाहीं ॥ ९ ॥

(१०)

सर्वीं सर्वत्र तूं पाहें । येथें कोणाचें काय आहे ॥ ध्रु० ॥ पंचभूतांचें हें देह । तूं कां वाहासी संदेह ॥ १ ॥ प्रपंच भूमीचें हें चित्र । हें तंव तुझेंचि कीं सूत्र ॥ २ ॥ दृश्य दिसतां गोड वाटे । तेथुनि आलें तेथ आटे ॥ ३ ॥ जाणें आकाशींच्या विहरी । चैतन्यसिंधूच्या लहरी ॥ ४ ॥ ऐसें ज्ञान जेथुनि झालें । देखणें त्यांत सामावलें ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे जगीं आलों । बोल बोलुनि बोलासी प्यालों ॥ ६ ॥

(११)

कांहीं बोलावेंसें नाहीं । रूप डोळावीण पाहीं ॥ ध्रु० ॥ वाचेवीण बोलणें । जेथ पायांविण चालणें ॥ १ ॥ कानेविण ऐक । स्वाद जिव्हेविण चाख ॥ २ ॥ त्वचेविण स्पर्श । भोगी चित्ताविण हर्ष ॥ ३ ॥ नासिकाविण वास । पडे मेघाविणें पाऊस ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे इये खुणे । एक अनुभविता जाणे ॥ ५ ॥

(१२)

तेव्हां झाली तुझी दया । निखिल निश्चयें सद्गुरुराया ॥ ध्रु० ॥ झाली नाहींचि दिसेल काया । मग सहजेंचि तुटली

...या ॥ १ ॥ वृत्ती स्थिरावली शून्या । माजी प्रकाश चैतन्या ॥ २ ॥ मन मौठपणाची मुद्रा । विराली तुजशीं समुद्रा ॥ ३ ॥ जगबुद्बुदीं तोय एक । जरी जागला विवेक ॥ ४ ॥ आरंभरंभस्तंभा । गैब विकाश निरालंबा ॥ ५ ॥ निजसुखाचे पडले बोल । गोड लागती उदास बोल ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे विसरे घडले । आंगीं अद्वय अंमल चडलें ॥ ७ ॥

(१३)

ऐसा गारोडी गारोडी । आपणयां भुली पाडी ॥ ध्रु० ॥ मृत्तिकेचें करोनि भांडें । आंत भरीयालीं लांकडें ॥ १ ॥ पाणी भरोनीयां त्यामध्यें । अग्नी पेटविला सन्निधें ॥ २ ॥ झंझा झणझणाटें वैसे । घडवट हालतें आपैसें ॥ ३ ॥ घडवटासि दश टव्वाळें । आपण त्या माझारी खेळे ॥ ४ ॥ दशव्या टवळ्यांत जो बैसे । नवहि प्रयोजिलें भूलीसें ॥ ५ ॥ पहिल्या टवळ्यापासुनि तंति । जोडियल्या चौथ्या सततीं ॥ ६ ॥ पहिली तंति वाजविली । तिघां जणांसी पडसि भुली ॥ ७ ॥ दावी स्त्रियेचें जो रूपडें । तेणें झाले अनेक वेडे ॥ ८ ॥ कापुसासि अनेक रंग । देउनि केलें ज्ञान भंग ॥ ९ ॥ पाषाणांत वहु झाळाळी । पाहातां बुद्धिचि ते आंधळी ॥ १० ॥ लोहासमान होय धातु । मध्यें दावी पिंवळी मातु ॥ ११ ॥ फालस समता होय पदार्थु । त्यांतहि दाविला वहु स्वार्थु ॥ १२ ॥ येही नवल करोनि आड । रोवोनि दावी जो पडिपाड ॥ १३ ॥ ऐसा गारुडी जो न देखे । सोहिरा गारुड्यातें वळखे ॥ १४ ॥

(१४)

न धरावा दुजा भाव । जवळीं असोनियां दुराव ॥ ध्रु० ॥ प्रेमें पूजी निजसखा । निजीं घेई निजसुखा ॥ १ ॥ गृहीं असोनि कामधेनु । कां ध्यावा याचकमान ॥ २ ॥ नित्य वनीं

चारी गाय। तेथ दुजा पाड काय ॥ ३ ॥ धणी माझा अ-पाडांचा। ठाक विषय पाडाचा ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे नसोनि असे। दिसे तें हें भ्रमपिसें ॥ ५ ॥

(१५)

आतां केशव गीतीं गाऊं। आह्मीं निजसुखासि पाऊं ॥ ध्रु० ॥ केशवाहुनि नाहीं थोर। हेंचि भाऊं निरंतर ॥ १ ॥ केशव आठवितां मनीं। मन बैसे समाधानीं ॥ २ ॥ केशव निरसी हा संसार। देई सारांतील सार ॥ ३ ॥ केशव भावोनि स्वामी माझा। भेद मोडूं माझा तुझा ॥ ४ ॥ केशव माझा मायबाप। लया न्हेतो पुण्य पाप ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे स्वरूपिं पाहूं। केशवचि होउनि राहूं ॥ ६ ॥

(१६)

हरि नको मजला सोडूं। दुजे पांगीलागीं पाडूं ॥ ध्रु० ॥ निजभक्तांचा हेलाडु। देउनि लावीं आपुलें वेडु ॥ १ ॥ तुझें नित्य स्मरण गोडु। हें काय ह्मणोनि सोडूं ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निज हें गाडु। निरसुनि निजी निजसुख जोडूं ॥३॥

(१७)

ब्रह्मरूप ते ब्राह्मण। हेंचि जाणावें प्रमाण ॥ ध्रु० ॥ ज्यांचीये चरणतीर्थें। सकळ पातकें होति व्यर्थ ॥ १ ॥ ज्याचिये आशिर्वादें। मन बैसे निजानंदें ॥ २ ॥ त्याहुनि आन थोर। सृष्टी नाहीं निरंतर ॥ ३ ॥ सोहिरा वंदी त्या चरणा। चुकवी आपुलिया भ्रमणा ॥ ४ ॥

(१८)

शुद्ध भावार्थाचें घर। परब्रह्म निरंतर ॥ ध्रु० ॥ तन मन आणि ध्यान। रिघालें निरंजन ॥ १ ॥ पृथ्वी आणि व्योम

यांचा न धरि जो संभ्रम ॥ २ ॥ नाम रूप जया नावडे । तया सांपडे सुखाडे ॥ ३ ॥ देवा नुरे देवपण । सोहिरा ह्मणे तो आपण ॥ ४ ॥

(१९)

ऐसे जाणावे ते भक्त । तेचि योगी तेचि मुक्त ॥ ध्रु० ॥ परा कमळ पर पराग । तेथ गुंतती जैसे भृंग ॥ १ ॥ अनाहत नागसर चांग । तेथ जैसे कां भुजंग ॥ २ ॥ निरंजन हेंचि गुळ । तेथ मुंगीचि केवळ ॥ ३ ॥ समाधी धन निज ज्योती । तेथ पायाळचि ह्मणविति ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे सत्रावीचें जीवन । तेथ निःसीम जैसा मीन ॥ ५ ॥

(२०)

आह्मा नकळे ध्यान मुद्रा । पावलोंचि सुखसमुद्रा ॥ ध्रु० ॥ मन बुद्धि मोडोनि ठेलें । अवघें तन्मयचि झालें ॥ १ ॥ बोलावया नकळे युक्ति । आंगीं बाणली विरक्ति ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे टाकिला मेरु । झाला परेपारउतारु ॥ ३ ॥

(२१)

आनंद नाचे हा श्रीरंग । वाजवी अनाहत सारंग ॥ ध्रु० ॥ मोठा होताहे गजर । नादें दुमदुमिलें अंबर ॥ १ ॥ बारा सोळा त्या गोपींकां । माजी तुर्या हे राधिका ॥ २ ॥ देख काया हे कदंब । यमुना सत्रावी स्वयंभ ॥ ३ ॥ इंद्रियें गोधनें चारिताहे । विवेक रक्षक उभा आहे ॥ ४ ॥ पेंदा सुदामा संवगडा । भक्ति ज्ञान वैराग्य वांकुडा ॥ ५ ॥ ब्रह्मरंध्रीं गिरिवरधारी । सोहिरा प्रतीति तयावरी ॥ ६ ॥

(२२)

तो मज आवडतो परम । भक्तकाजकल्पद्रुम ॥ ध्रु० ॥ ज्याची सत्ता अगोचर । येवढें चाले हें शरीर ॥ १ ॥ असे तंव संसारीं भुलवी । परि त्यामाजी मज न भुलवी ॥ २ ॥ अनेक

लाघव मांडी । परी मज भ्रमांतुनि काढी ॥ ३ ॥ वैराग्यवन-वसंत । अक्षय देव सदा संत ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे केली दया । आतां न विसरों तया ॥ ५ ॥

(२३)

तुझा तूंचि कीं दातारा । घेसी अनेक अवतारा ॥ ध्रु० ॥ तूंचि कल्पने कर्तारा । तूंचि स्त्रियेच्या भर्तारा ॥ १ ॥ तूंचि नक्षत्र कीं तारा । तूंचि तिमिर कांतारा ॥ २ ॥ तूंचि जिव या उतारा । शिव भव सिंधु उतारा ॥ ३ ॥ तूंचि बाळही झातारा । तूंचि गोकुळासि तारा ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे तूंचि सारा । सारा परता त्यांतिल सारा ॥ ५ ॥

(२४)

निरंजन सेजे । सुलीन कलावंती । भोगिती सततीं । योगीराज ॥ध्रु०॥ काम क्रोध बंधु । आशा तृष्णा बहिणी । त्यागिल्या कामिनी । बारा सोळा ॥ १ ॥ अविद्या हे माता । अहंकार पिता । ढांकिली ममता । कन्या कीं हे ॥ २ ॥ निष्ठुर होउनि । मिनले परद्वारा । मन बुद्धि संसारा । मोह न घे ॥ ३ ॥ होउनि सचाड । सेविती रती चाड । इंद्रियां कवाड । देउनियां ॥ ४ ॥ असतांचि उघडीं । इंद्रियें झांकलीं । वृत्ती सांवकली । तयाठायीं ॥ ५ ॥ रात्री कीं दिवस । भोगितां हा नेणे । विरळा कीं हे खुणे । बुजती कोण्हीं ॥ ६ ॥ न गणी जीव शिव । दोन्हीं भेदाभेद । निजानंद छंदें । रंजले कीं ॥ ७ ॥ सोहिरा ह्मणे आम्हांहि । तेचि कीं व्यसन । वासना वसन । धरे आंगीं ॥ ८ ॥

(२५)

देवावीणें काम । दुजें नसे धाम । तरि हा आत्माराम । भेटों सके ॥ ध्रु० ॥ देवची चालतां । देवची बोलतां । देवचि निजतां । समाधीसी ॥ १ ॥ देवचि हेळतां । देवचि खेळतां ।

देवचि मेळतो । आपेंआप ॥२॥ सोहिरा ह्मणे दुजें । कांहींचि नसावें । होऊनि असावें । देवरूप ॥ ३ ॥

(२६)

देव भावीं नित्य । स्वरूपीं अनित्य । भक्तीचें हें सत्य । थोर आहे ॥ ध्रु० ॥ भक्तीचिया भावा । भेटे स्वयमेवा । आत्मानुभवा । पावीजे तो ॥ १ ॥ देवाहुनी थोर । नाहीं निरंतर । ऐसें हें अंतर । निर्वाळिजे ॥ २ ॥ भक्तीचिये चाडी । गुंतला आवडी । अविद्येचि बेडी । तोडिजे तो ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मग । भक्त तोचि देव । यदर्थीं संदेह । नाहीं नाहीं ॥ ४ ॥

(२७)

ऐसें हें कौतुक । देख अलोलिक । वैकुंठनायक । भेटला तो ॥ ध्रु० ॥ भेटीविण मज । निजीं नये निज । सवें यदुराज । देखल्या विण ॥ १ ॥ आनंदें भाविन । होईं समाधान । सर्वेचि निदान । गोड करी ॥ २ ॥ ऐसा हा श्रीहरी । वदावा वैखरी । बोधाचे सागरीं । बुडवील ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे माझा । भावीं जीवलग । निवृत्ति निर्वंग । भोगीन तें ॥४॥

(२८)

हरीभेटीसाठीं । साधन आटाटि । तो मज सेवटीं । आंतुडला ॥ ध्रु० ॥ ज्याच्या स्वरूपा लागीं । श्रमताती योगी । तो मज पूर्णांगीं । वोसंडला ॥ १ ॥ ऐसा हा निर्गुण । धरोनि सगुण । येकीयेक खुण । जाणीयली ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे तो हा । न्हे विश्रांतिगेहा । ज्याणें निःसंदेहा । मेळविलें ॥ ३ ॥

(२९)

ज्याचें हें स्वरूप । वेदांसीं अग्रुप । तेथ कोण माप । करूं सके ॥ ध्रु० ॥ ज्याचे हे पवाडे । बोलों जातां तोंडें । ब्रम्हादीक वेडे । झाले जेथ ॥ १ ॥ ऐसा आत्माराम । भावोनि आराम ।

जेथ सर्व काम । हारपले ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे ज्याचा । परिकर साचा । आपुले मुळींचा । ठाव दावीं ॥ ३ ॥

(३०)

आनंदें आनंद । जोडे निजपद । खंडी भेदाभेद । अंतरींचा ॥ ध्रु० ॥ ज्याला नित्य ध्यानीं । जाणीला निदानीं । सर्वें या साधनीं । काज काय ॥ १ ॥ काजाविण ज्याणें । पावविलें खुणे । तेथ वारवाणे । काय मग ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निज । बोध हा सहजें । जेथ सर्व काज । हारपलें ॥ ३ ॥

(३१)

जेथ पूर्ण ज्योति । भाविलि सततीं । भवभ्रमभ्रांती । दूर झाली ॥ ध्रु० ॥ आनंदाचे जळीं । देतां चुबकळी । कल्पनेचि मळी । झाडीयली ॥ १ ॥ जेथ पूर्णपण । आतुडे प्रमाण । चैतन्य उगाण । झालें जेथ ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निजीं । निजेला सहजीं । स्वरूपाचे शेजीं । पहुडला ॥ ३ ॥

(३२)

आनंदाचे जळें । भरियले डोळे । चैतन्य सोहळे । भोगीयले ॥ ध्रु० ॥ ज्यासि शांति पंथ । आतुडे सनाथ । सर्वें आदिनाथ । भेटला तो ॥ १ ॥ सोहिरा ह्मणे माझा । सखा जिवलग । जेणें हें सर्वांग । वसविलें ॥ २ ॥

(३३)

देवावीण येथ । दुजा नाहीं नाथ । त्याविणें सनाथ । कोण करी ॥ ध्रु० ॥ देवाविणें आतां । मज नाहीं दाता । निज हे तत्वता । कोण दावी ॥ १ ॥ देव माझा बाप । देवचि स्वरूप । देव दिव्यरूप । रूपातीत ॥ २ ॥ देवचि हें सार । देवचि संसार । देव निरंतर । वेगळाचि ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे येकीं । येकचि होउनि । सर्वें समाधानीं । राहावें गा ॥ ४ ॥

(३४)

भाविन सहजां । निज योगीराजा । मनाचिया काजा । दूर करी ॥ धृ० ॥ मुलींचा गोसांवी । घराचार भावी । पाहातां नागवी । सदांचा जो ॥ १ ॥ वेढीला लेंकुरीं । बाळ ब्रह्मचारी । कैसा तो अंतरीं । जाणावा गा ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे वांझीं । निपजला पुत्र । तोचि हें विचित्र । पाहावें गा ॥ ३ ॥

(३५)

तुझेंचि हें केलें । पापपुण्य ठेलें । तेथ माझें गेलें । काय पां तें ॥धृ०॥ करोनि अकर्ता । धरोनि न धर्ता । तूंचि एक हर्ता । सुख दुःख ॥ १ ॥ निजरूपीं लया । लावीं यदुराया । सर्वेचि हे माया । दूर करीं ॥ २ ॥ चित्त हें केवळ । तुजसीं प्रेमळ । दुजे याचा आळ । आणूं नको ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे बापा । अनुभव सोपा । करीं निजकृपा । आपुली ही ॥ ४ ॥

(३६)

धन्य हा योग । धन्य हा योग । देह टाकुनि सत्ता । सुखेंचि हा भोग ॥धृ०॥ चित्रांमाजी भिंती । नसों या दीसती । तैसी देख ज्योति । दृश्याकारे वा ॥ १ ॥ तरंगीं हा सागर । कीं लवणीं आगर । तांदुळीं वोगर । नानापरी वा ॥ २ ॥ घटीं मृत्तिका । पटीं तंतु एका । भज तेविं सकळिका । आत्म रूपें वा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ऐशा । बोधाचि खुण । पावला तो जाण । योगीया ऐसा ॥ ४ ॥

(३७)

निःस्पृह झाला । संसार सुटला । परब्रह्मीं भेटला । आपेंआप ॥धृ०॥ न गणी देह हें । न गणीं इंद्रियें । जाहला जितेंद्रिय । निरालंबीं ॥ १ ॥ न गणी हे जन । न गणी मीजन । भो-

गी निरंजन । अखंडीत ॥ २ ॥ न गणी हे पृथ्वी । न गणी हें व्योम । पावला आराम । भ्रमरगुंफे ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे कर्म । करोनि निष्कर्म । अवचटेंचि वर्म । हाता आलें ॥ ४ ॥

(३८)

डोळ्यांतील डोळा । देखिला निराळा । भोगिला सोहाळा । सत्रावीचा ॥ ध्रु० ॥ न होतां कीं उत्पन्न । देखिलें हें जग । बोलेंगे राजयोग । नित्य ऐसा ॥ १ ॥ पाहातां तुरे जन । बुद्धि आणि मन । जाहाला निरंजन । रूप कीं हें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे तुरे । मग हें मींपण । सर्वत्र आपण । तोचि झाला ॥ ३ ॥

(३९)

दळुबाई दळु । तोंवरीच गाऊं । दळण विसावें तें । सुख सेऊं ॥ ध्रु० ॥ अभ्यासाचें जातें । विकार कणवठ । दळुनि करूं पीठ । वासनेचें ॥ १ ॥ मन पवन दळणारी । बारा सोळा नारी । कारणाचे घरीं । पीठ न्हेऊं ॥ २ ॥ विवेकपाणियें । शून्याची पितळी । मळुनी करूं गोळी । ऐक्यत्वाची ॥ ३ ॥ त्रिकुटचुलवणीं । वैराग्याचा अग्नीं । कल्पनाइंधनीं । जाळ करूं ॥ ४ ॥ भक्तिचा हा तवा । निश्चयेशीं ठेऊं । साम्य तें बसऊं । नीट ऐसा ॥ ५ ॥ व्यतिरेकगोळी । अन्वयेसीं चढऊं । अभेदचि घडऊं । भाकरी हे ॥ ६ ॥ एकवेळ परतूं । सृष्टी नाहीं पण । परतोनी मींपण । पुरतें भाजूं ॥ ७ ॥ काढोनियां ठेऊं । आनंद निवऊं । परेपरती सेऊं । लागों पुढें ॥ ८ ॥ सोहिरा ह्मणे ऐसी । सेवितां भाकरी । नलगेचि चाकरी । करणें आतां ॥ ९ ॥

(४०)

गर्जतां पै नवघन । मयूरचि नाचे । येरां काय तयाचें । प्रयोजन ॥ १ ॥ वाजतां नागसरी । नागची डुले । आणि

दिवड चाले । आपुलिया काजा ॥ २ ॥ पंचमालाप । एकत्या सोहाळे । बहिऱ्या काय कळे । तयांचें प्रेम ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा होतां ब्रह्म । चर्चा साधुची समाधान । उपसर्ग अज्ञान । तयाचा ना भीं ॥ ४ ॥

(४१)

हंसाचा चारा । न इच्छिती वायस । आणी मेलेया मांस । भक्षितिल त्याचें ॥ १ ॥ नागसरीसें सुख । दिवडा कैंविं कळावें । उंदीरचि गिळावे । त्याणें पैं गा ॥ २ ॥ अग्नीमाजी सती । एकलीच जळे । आणि पाहावया मिळे । सकळजन ॥ ३ ॥ जैसा कोणी एक । न झोंबे साधुचिया आनंदा । आणिक करावया निंदा । कितेक मिळती ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा थांत । आमचें काय गेलें । तुमचें केलें । पावाल तुह्मीं ॥ ५ ॥

सवाया.

(१)

संसारीं वीटेना भ्रांती ही फिटेना तंववरी भेटेना देव तया ।
जातीचा निष्ठुर केवळचि क्रूर नाहीं जया कीं हे भूतदया ॥
अंतरीं कीं मळ बाहेरि निर्मळ करुनि आला कीं काशी गया ।
सोहिरा ह्मणे कीं यम दंडितसे शेवटीं घालीतसे निरया ॥

(२)

नित्य स्मरीं हरिध्यान हें अंतरीं जीव हा उद्धरीं येणेंचि गा । शिघ्रचि हें सुख रूप नाहीं रेख अज्ञान हें देख नेणेंचि गा ॥ देह हें पेणेंचि दुःखाचें केणेंचि भ्याला कीं या भवभेणेंचि गा । सोहिरा ह्मणे तुला नासुनि हेतुला आत्माचि तो तुला नेणवे गा ॥

(३)

देख देह तृण अंतरींची खुण टाकुनि त्रिगुण राहें कीं गा । आपुला अभाव दृश्य दीसे माव कल्पनेचा घाव पाहें कीं गा ॥ आत्मा हा अरूप साक्षी जसा दीप त्याचाचि ध्यास वाहें कीं गा । सोहिरा ह्मणे कीं हें संचित वेंचित विदेही होउनि राहें कीं गा ॥

(४)

दावीतसे देवा आत्म स्वयंमेवा संतांची कीं सेवा कारण हो । जीव ते शीवचि होउनि तल्लीन पावले दीन उद्धारण हो ॥ जीवन्मुक्त कीं हे युक्तचि होउनि उक्तचि योग सुधारण हो । सोहिरा ह्मणे मूळ बिंदु आनंदू हा भवसिंधूचा कीं तारण हो ॥

(५)

विश्व विचित्र हें चित्रची पाहाती राहाती निमग्न नित्य कीं हे । सुख हें सारुनि दुःख निवारुनी असतांचि पाहाति भग्न कीं हें ॥ हिरोनी सर्वहि फिरोनि देखती दूरुनि दृश्य संलग्न कीं हें । सोहिरा ह्मणे कीं हे संपत्ती दैवीशीं देहींच लावीति लग्न कीं हें ॥

(६)

संकेतें जाण हा लिंगदेहावरी लंकेंत राम जसा कीं रीघे । असुरसंपत्तीमाजी हे सर्वही राक्षस मारी हे गूण तिघे ॥ अन्वय स्थापी बिभीषण बोध हा लोक चिरंजीवचि अवघे । सोहिरा ह्मणे जीवीं सर्वही जाणुनी आणुनि ध्यानीं कीं हे चवघे ॥

(७)

दृश्य हें आटलें सुखचि वाटलें तेंचि कीं दाटलें अंतरीं हें । मिथ्याचि हें देह फीटला संदेह विदेह ब्रह्म निरंतर हें ॥ बुद्धींचें बोद्धव्य चित्ताचें चेतव्य मींपण झालें अवतारी हें । सोहिरा ह्मणे कीं मग्न झालें मन अनुहात नाद वाजंतरीं हें ॥

(८)

एवढें भूमंडळ ज्यावरी भासत अवघेंचि नासत दृश्य कीं हें। अनादी ब्रह्म हें अगम अगोचर अतीत आहे सादृश्य कीं हें ॥ अनन्य भक्त विरक्तचि मुक्त जे त्यांप्रती आहे सादृश्य कीं हें। सोहिरा ह्मणे योगी जैसे जो पाहात त्यांप्रती जाण तादृश्य कीं हें ॥

(९)

भक्ती करी तया सन्निध श्रीहरी पावतो लवकरि वेळ नसे। संसार खेळ हा हेळसुनि मनीं त्यांतचि त्याला कीं टेळितसे। वर्मचि जाणुनि चर्म वृथा कीं हें कर्मचि ब्रह्मीं हें मीळतसे। सोहिरा ह्मणे चैतन्य सनातन लक्ष्मूनी प्रेमें लोळतसे ॥

(१०)

ब्रह्मचि लाभलें तेणेंचि कीं भलें नरदेह शोभलें यास्तवची। आनारिसें जनीं विरक्तचि मनीं करती निरंजनीं वास्तवची ॥ वेदांताचि गति अनिर्वाच्य ख्याती अती गती मती हा स्तवचि। सोहिरा ह्मणे कीं आनंद दाटला संसार वाटला नवलची ॥

(११)

दृष्टिसी वाणलें शून्यचि आघवें देहाच्या लाघवें गुंतेचि ना। भितो कीं यमाला न चुके नेमाला योगक्षेमाला कीं कुंथेचिना ॥ सर्वचि भोग हा रोग दिसे वरी इंद्रियांच्या घरीं येतचिना। सोहिरा ह्मणे देव संतचि पाहात मिथ्या हें चित्तीं कीं घेतचिना ॥

(१२)

आदी नसे देह अंतींही नाहींच मध्ये हें वाईंच भासतसे। योगानें सोडला भोगानें वेढला रोगानें कोंडला त्रासतसे ॥ संग करीतां हा रंग दीसे वरी क्षणक्षणा कीं हें नासतसे। सोहिरा ह्मणे जीव नाथिलाचि भव शाश्वत मानुनी आसतसे ॥

(१३)

संसारींचें सुख मिथ्याचि आहे कीं उगाचि वाहे कीं ध्यास कीं हा। अवघाचि हा भ्रम केवळचि श्रम नाहीं आराम अभ्यास कीं हा॥ ब्रह्मीं हें अर्पण कर्म करूं नेणें मींपणावीण संन्यास कीं हा। सोहिरा ह्मणे कीं हा देहचि देखतो विस्मयें नेणें शून्यास कीं हा॥

(१४)

चित्तचि चैतन्य होउनि राहिलें सर्वचि पाहिलें शून्य कीं हें। भिन्न न मानी हें चिन्ह तया प्रती नाहीं जगाचें पैशुन्य कीं हें॥ अंतर बाहेर अंबर दाटलें देह न वाटलें न्यून कीं हें। सोहिरा सहज आहे कीं पाहात आपेचि पातलें मौन्य कीं हें॥

(१५)

देहाचे संगती व्यर्थ गेली मती अंतीं नाहीं गती ज्यासी कीं हे। सर्वकाळीं धंदा हाचि मतीमंदा संतांचि हे निंदा ज्यासी कीं हे॥ व्यर्थचि हें जीणें आत्मज्ञानावीणें अन्वयें नेणेंचि न्यास कीं हा। सोहिरा ह्मणे खुणे पावलियाविणे कांहींच नेणे अभ्यास कीं हा॥

(१६)

आठवितां हरी सुख हें अंतरीं ब्रह्म सर्वांतरीं व्यापिलें हें। स्थावरजंगम दृष्टीसि हा भ्रम अज्ञान कर्म आरोपिलें हें॥ शरीरें हीं साजीरीं मुखेंडी माजुरी संसार आजारीं खपिलीं हें। सोहिरा म्हणे तुज स्वहिताकारणें केवळ तत्त्व निरोपिलें हें॥

(१७)

हे नरदेह गमाउनि विभ्रमें संसार करणें तो व्यर्थ कीं हा। कोठिल कोण मीं काय वाहातसें विस्मय नेणोनी अर्थ कीं हा॥ स्वार्थचि मानुनि दृश्य पदार्थीं हा अवघाचि भोगी अनर्थ कीं

... ह्मणे देह रोगचि भोग हा आत्म वियोग किमर्थ ... ॥

(१८)

...तसमागम दुर्लभ मानुनि सुलभ लाभ अलभ्य कीं हा। आत्मनिदर्शन सर्वचि निरसन वर्पण चिद्धन लभ्य कीं हा ॥ मानवयोनी तो वद आनंदला सर्वभूतीं तो हा सभ्य कीं हा। सोहिरा ह्मणे तो हा सज्ञान सज्जनचंदन ज्ञानसौरभ्यं कीं हा ॥

(१९)

सुमनदेहीं सुगंध तसा हरि वारी हें व्याप्य कीं रसा। जेवीं घटीं मठीं व्यापक अंबर देख दिगंबर देव तसा ॥ लक्ष हें लाउनि नित्य निरंजनीं असोनियां कीं देहांत नसा। सोहिरा म्हणे पर-ब्रह्म सुखांत कीं आंतले आंतचि स्वस्थ बसा ॥

(२०)

कोठिल कोण कसा मी हें जाणोनी इंद्रियें रोधुनी नित्य पाहा। निर्गुण निर्मळ शांत सदोदित तेथिलचि निजध्यास वहा॥ आसत नासत सर्व प्रपंच हा शून्यचि राहिलें त्यांत रहा। सोहिरा ह्मणे तें पहाणें पहातां अलक्षीं लक्ष आनंद महा ॥

(२१)

रूप न रेख दिठीविण देख तो अवधूत दिव्य दिगंबर हा। ज्याचिये पोटिं ब्रह्मांडें हि कोटी अनंत अपार चिदांबर हा॥ स-र्वचि व्यापक भूतकलापक ज्ञानप्रकाशक ईश्वर हा। सोहिरा ह्मणे तो संतसमागमें सुलभ होय निरंतर हा ॥

(२२)

संसाररोग हा भोगचि मानुनि शोक कीं करती ते लोक पिसे। धांवत मृग मृपा जळीं देखत तेंवीकीं दृश्य हें स्पष्ट दिसे॥ क्लेशचि पावती देहमिसें परी ईश्वरभक्तिचा लेश नसे। सोहिरा ह्मणे मन भ्रमित होउनी केवळ पावले जीवदशे ॥

(२३)

विस्मय पाउनी जीव दशे हरी अंतरींचा किमपि न दिसे। धर्कीचि ना कीं कुतर्क वसे मनीं केवळ अज्ञान बाध बसे ॥ मातिघटीं पटीं तंतु वसे तेंवी सर्व घटीं कीं हा देव असे। दृष्टींत सृष्टी भरे ह्मणे सोहिरा संतसमागम ज्यासी नसे ॥

(२४)

सज्जनरंजन नित्य निरंजन अंजनज्ञानसूर्य नयनीं। निर्गुण निर्मळ नित्य सदोदित जागृत होउनियां शयनीं॥ अधृति जाउनि धैर्य स्थिरावलें मग्न कीं होउनियां गगनीं। सोहिरा ह्मणे गुरुगम्य सुखामृत दीवस नाहीं कीं हे रजनी ॥

(२५)

संतजना देव गुप्त निरंजन मूर्खजना देव पाषाण हा। नैराश्य भाषण ज्ञानिजनामति आनचि तें कथीं मूढ कीं हा ॥ चोरचि आपण थोर कीं हा ह्मणे घोरचि वाहातो अवघा कीं हा। सोहिरा ह्मणे त्याचें दर्शन कासया साधक त्याग तुं स्पर्शनीं हा ॥

(२६)

आच्छादिला कीं हा तंतुपटीं दिठीं विस्मय पावला मातिघटीं। देह हें देखोनी विस्मृति होतसे आत्माचि हा नटला कीं नटीं ॥ पूर्विल पुण्य हें पूर्ण गुरुकृपें ज्योतिच वेगळी हे नीवटीं। सोहिरा ह्मणे तो हा सर्वचि त्यागुनि शेवटीं बैसला मोक्षपटीं ॥

(२७)

जन्मासी आलासी संसारीं धालासी आंतचि झालासी गर्क कीं गा। न घेसी अनुभव बाधतो हा भव कांहींच न चले तर्क

कीं गा ॥ क्षोभची अभ्र हे लोभ कीं यामिनी आच्छादिला ज्ञान अर्क कीं गा। सोहिरा ह्मणे तूं नेणोनी वर्तसी फुकट भोगीसी नर्क कीं गा ॥

(२८)

नरदेह नर्म हें चर्म दीसे वरी नेणसी अंतरीं वर्म कीं हें। पांचांचें पंचक लिंगदेहात्मक वर्तत वासना कर्म कीं हें ॥ सुख स्वधर्म हें देतचि आघवें दुःखचि देत अकर्म कीं हें। सोहिरा ह्मणे जीव ब्रह्मची होतो मुक्तचि होतें विकर्म कीं हें ॥

(२९)

केव्हांची नासत नकळे कीं हें देह यास्तव ईश्वरभक्ति करीं। अज्ञान जावया ज्ञान हें व्हावया सत्वर संतांची कास धरीं ॥ अनुभव घेउनी अंतरींचि कीं हा अक्षय हे निज शांती वरीं। सोहिरा ह्मणे देव विस्मरो हा नये येणेंचि सर्वही दुःख हरीं ॥

(३०)

नलगेची आवडी आत्मरूपीं जया कारण कीं भया तेंचि तया। चैतन्य चाळक नेणोनि पाळक देखत देह हें भूलवया ॥ नेणुनी वाड हा भूतगुणत्रय आत्माचि घ्यावा हें नाहीं जया। सोहिरा ह्मणे तो पापीया जाय कीं घेतसे एकी या निरया ॥

(३१)

चारी ही खाणित दृष्टिसी नाणित शोधितसे कीं हा देव दुजा। जाणुनि नेणती मूर्ख कीं हें जन पाषाण भावुनी करतीं पूजा ॥ जेथुनी झालें हें दशम अग्र कीं विसरोनि जाती त्या मूळ विजा। सोहिरा ह्मणे कीं हे दुःखचि पावती नेणोनियां गुरूगम्य गुजा ॥

(३२)

चौऱ्यांशी लक्ष योनीमधें हें नरदेह हा जाण कीं लाभ तुला । यामधें ईश्वर आहे तरी कसा अनुभव घ्यावा कीं हा आंतुला ॥ भवांतुनी निघ निरंजनीं रिघ गुणची तीघ हे बद्ध तुला । सोहिरा म्हणे हा कर्मसंन्यास कीं नास तूं त्रीविध या हेतुला ॥

(३३)

मिथ्याची मानुनी वर्तती या देहीं नैराश्यचि जीव शुद्ध कीं हा । देखे निरामय निर्गुण निर्भय जिताचि मुक्त प्रबुद्ध कीं हा ॥ विरळा कीं मानवयोनीमधें तो हा सर्वही साधन सिद्ध कीं हा । सोहिरा म्हणे तो हा ब्रह्मचि होउनी सर्वचि सांडी विविध कीं हा ॥

(३४)

ईश्वरें उत्पन्न सर्वचि केलें कीं यांतिल उपमा हे त्यासी नसे । शून्य हें व्यापक ज्ञानप्रकाशक चैतन्य त्यांत अतीत असे ॥ योग हा साधला देव आराधला निश्चयें लाधला दैववसें । सोहिरा म्हणे स्वयंब्रह्म हें सन्निध अंतरीं निश्चय दृढ बसे ॥

(३५)

साधूचे अंतरीं काय वसे तें हें नकळेशि केवळ मूर्खजना । सर्वांचि सारिखें नरदेह हें देखे न दीसे संत असा कीं मना ॥ दृश्य पदार्थ हा साचचि मानुनी चित्तीं अनेक कीं या कामना । सोहिरा म्हणे तो हा सर्व जाणे परी चित्तची नये कीं हें दमना ॥

सेली.

(१)

ज्यागत जागी गैब गगनमें अॉलख निरंजन देख। गाढा साहेब थाढा सबसें उनकुं नाहिं रूप रेख॥ जुगुत जुगुतसें पवन चढावे दिलपर देना मेख। कहत सोहिरा अपना प्यारा बहुत भेसमें एक॥

(२)

उलट किया मैं पलख अलखसें लगन लगी हरवख्त। मगन मस्त मैं गगनमाहालमें गैब हमारा बख्त॥ नारी पुरुख नहिं रूप रेख वो देख निरंजन तख्त। कहत सोहिरा त्रिकुट अलंगपर मलंग फकीर मैं फख्त॥

(३)

बासकुं खोदत श्रीग दिवाना बुडिका दिल दस्तुर। बेटी-चोदकुं मालुम नहीं तेरे बोंबीमे कस्तुर॥ निर्गुन निरंजन आपमें है आदमी साधनपर चातुर। कहत सोहिरा कामकुं खोदत नहीं वें कामातुर॥

(४)

सब दुनियामें देख्या मैं तों तन बीन मृगजल पूर। फजर दुपारसें शाम नहीं हो गैब सुरज भरपूर॥ तऱ्हां तऱ्हां कीं ज्याहांकी नौबत बाजत अनुहत सूर। कहत सोहिरा उलट पलखसें वाहांसो मैं महसूर॥

(५)

अपनी सूरत फेर फेर पलखसें देख तुम जोगी। बाजत बाजा लगन गगन आनाहत तुझारी सींगी॥ नवद्वारकुं छोड छोड कर दसवे द्वारकुं ज्यावो। तनके पास तो सबका रहना

मनपवना तूर्त लिज्यावो ॥ भछलछकु लेता नहीं वोही करार रखना बंद । तोरे अखियांकुं करे चकियां उनकुं समाध पुनवा चंद ॥ ग्यान ध्यान मगन बैठे तो उनक पीना दुधवां । जोग जुगतसें चढते जाव तो गिरिवर है गवां ॥ कहत सोहिरा जिन्ने भरिये नादबंदकी पेटी । अंदर है सो बाहेर दिखना चिंता रखना झुटी ॥

(६)

दूधके बीचमें घीका रहना ओतो साची बात । सगुणमें निर्गुन तैसो रहता उनकुं न लगत हात ॥ गुडें कीं तो शक्कर आवती कछु तो करामत लगती । कहत सोहिरा ज्योग जुगत बिन कैंव मिलें अंदर ज्योती ॥

(७)

फत्तरफुल तो सहज फुले वुन बनमों जैसो बसंत । विषयो भोग लगावे सब इंद्रिय तनसें मनसें न्यारा संत ॥ खजमत करनेवाले चेले मौनमे बैठे महंत । कहत सोहिरा उनकुं पाया लागत नहीं बे अंत ॥

(८)

तख्त बडा निरंजन बाबु वख्त बडा अबिनाश । कोही बख्त बढेंगा तनपर मैतो फक्त फकीर उदास ॥ माया जेफ्तके दफ्तरमें जितना तितना पोंचत नाश । कहत सोहिरा सब तो मृगजल हकनक क्या करूं आस ॥

(९)

खैब साहेब गैब निरंजन दिलमें रहता राम । उलट पलट सब पोथी कीये ग्रुमें तेरा नाम ॥ ऐसा होके पेटके खातर दुनियांको करे सलाम । कहत सोहिरा मुरुख आदमी अब कायकुं लियेते जनम ॥

आरत्या.

(१)

निरंजननिवासित देहातित देवा। घडती इंद्रियद्वारें तुझीच सेवा॥ मजमाजी सांपडला अनादी ठेवा। सेविला काय सांगों सुक्यानें मेवा॥ १॥ जय देव जय देव जय लालनलीला। येकीं अनेक जग हे बुदबुदसलीला॥ ध्रु०॥ रूपाविण ऊभा अलभ्य लाभा। घडलें मन हें बुडलें विश्वाभ्र नभा॥ महानंद समुद्रीं भरियेलें कुंभा। मन हें तद्रुप झालें सकलाधिरंभा॥ जय देव०॥ २॥ दिपीं दीप मेळे जैसा कां उजळे। वाचा बोलों हालों विसरले डोळे॥ नेणो कैंचा ऐसा मजमाजी मेळे। सोहिरा दास ह्मणे अभिमान गळे॥ जय देव०॥ ३॥

(२)

चिन्मय निरामय सुखसार सये। जेथें गेल्या दिठी हे परतोनी नये॥ निर्गुण निरंजनीं मन हें विलय। जाउनी सहज आंगीं सुरलें तन्मय॥ १॥ जय देव जय देव जय पूर्ण ज्योती। नाद विंद कळा ज्याची विभूती॥ ध्रु०॥ आदी अंत नाहीं ज्या स्वरूपासी। नाम रूप पाहातां मिथ्याची त्यासी॥ निर्विकल्प समाधीचे उल्हासी। रंजोनी ठेलों निरालंब गगनासी॥ जय देव०॥ २॥ जाणणें जाणतां जाणीव गेली। मजमाजी निजतां निज उन्मनी लागली॥ बोलों जातां वाचा तटस्थ ठेली। सोहिरा ह्मणे चैतन्य सत्ता वाणली॥ जय देव०॥ ३॥

(३)

मनमोहन गहना चित्सुख चिद्धना। जगदखिल पालना लीलालालना॥ भावातित देवा अभिनव भावना। आरती ओंवाळूं तुज निरंजना॥ १॥ जय देव जय देव जय सच्चिदानंदा। विचारविंदा पूर्णप्रबोधा॥ ध्रु०॥ अनादी उदयो

झाला पूर्णिमा इंदु । देखुनि उल्हासला महानंदसिंधु ॥ भक्तजन-चकोरां अनुपम्य स्वादु । पूर्णतेसी आलें अविनाश द्वंद्व ॥ जय देव० ॥ २ ॥ मायामय रजनी प्रकाश आला । दृश्यरूप खद्योत निस्तेज झाला ॥ वैराग्याच्या वना लव लव सुटला । विवेक-भ्रमरा आंगीं आनंद दाटला ॥ जय देव० ॥ ३ ॥ तन्मय को-किळेच्या कलरवझरीं । उठला नाद अंबरीं अनाहत गजरीं ॥ सोहिरा दास ह्मणे मेरुची शिखरी । वरि व्याली हे नार अरूप सुंदरी ॥ जय देव० ॥ ४ ॥

(४)

अकुल अगोत्र स्वयंभ स्वतंत्र । भक्तजना मित्र परम पवित्र ॥ याहुनी दुजा नलगेचि मंत्र । इंद्रियें चाळवितो निखिल चिन्मात्र ॥१॥ जय देव जय देव आनंदघना । अनेक तुझी लीला विश्व हें नाना ॥ध्रु०॥ अंतर निरंतर निज निरंजनीं । मन हें जाउनी आजी लागली उन्मनी ॥ झालें सुख हें देखों नयेचि नयनीं । वाचा झाली मुकिया महाशून्यीं ॥ जय देव० ॥ २ ॥ चित्सु-र्याचा झाला परम प्रकाश । चित्कलिकेमाजी उठला उल्हास ॥ समूळ दृश्याचा मावळला भास । पाहूं जातां आपण मींपणा नास ॥ जय देव० ॥ ३ ॥ अनादी देव जाण हा अभंग । नि-जरंगीं रंगला आत्मा श्रीरंग ॥ आनंदसिंधूचे उठती तरंग । सोहिरा ह्मणे सहज निवृत्तीमार्ग ॥ जय देव ० ॥ ४ ॥

(५)

सहजचि केली हे आरती । तन्मयाच्या वाती ॥ आनंद-स्नेहेंचि उजळुनि । चिन्मयनिजज्योति ॥ ध्रु० ॥ देवचि नाहीं कीं उरला । ओंवाळितां मुरला ॥ भेदाभेद हा हरला । परे परता सरला ॥ १ ॥ गातां गातां हा नाठव । उरला नाहीं ठाव ॥ सोहिरा ह्मणे मीं कोठें । जाऊं माजा मींच देव ॥ २ ॥

(६)

आरती उजळली । शुद्ध सत्वाचिये ताटीं ॥ मनपवनाची वाती । केली गगनाचिये पोटीं ॥ प्रेमाचें हें तैल आंत । भरियलें उपाटीं ॥ प्रकाश हा प्रकाशितां । चंद्रसूर्या पडली मिठी ॥धु०॥ देख ऐसें निरंजन । वरि ओंवाळिले जन ॥ ऊर्ध्व लक्ष्य लागतां हें । उन्मळिलें लोचन ॥ कवणाचें हें कवण नोहे । ऐसें केलें कीं येणें ॥ दोरावीण नव द्वारें । बद्ध केलीं कीं जेणें ॥ तया ठाया लागीं आजी । सिद्धसाधूंचें जाणें ॥ वासना हे बुडे ऐसें । ज्ञानगंगेचें न्हाणें ॥ १ ॥ तया लागीं दोनी पंथ । विवेक सुषुम्नेची वाट ॥ गुण त्रय टाक वेगीं । त्रिकुट श्रीहट गोल्हाट ॥ साम्यावस्था ककारमुख । सर्वसाक्षी औट पीठ ॥ २ ॥ उन्मनीं ते भ्रमरगुंफा । निराकार निर्गुण ॥ तये भूमीवरी विश्व । चित्राकार हें जाण ॥ आले गेलीयाचें नका । करूं भूषण दूषण ॥ सोहिरा म्हणे मीपण जाय । निजधर्म तें आपण ॥ ३ ॥

(७)

मुनिजनमानसहंसा सज्जन गा रामा । योगीयांसीं करिसी नित्य आरामा ॥ यालागीं जपती निशिदिनीं प्रेमा । स्वसुख देउनि माझ्या हरीं या भवभ्रमा ॥ १ ॥ जय देव जय देव जय जी अनंता । आरती ओवाळूं तुज कृपावंता ॥ धु०॥ ज्ञानेंद्रियताटीं कर्मेंद्रियवाती । पंच प्राण मजळुनी करूं एक ज्योती ॥ सोहंशब्दें दीप्ति अति प्रकाशिती । शिवशक्तीसम योगें सहज विलसती ॥ जय देव० ॥ २ ॥ दृश्य द्रष्टा जेथींचें हरोनी गेलें । मजमाजी स्वरूपीं दर्शन झालें ॥ देहबुद्धि जाउनि मन हें मावळलें । सोहिरा ह्मणे जन्म मृत्य आकळलें ॥जय देव०॥३॥

(८)

व्यक्त अव्यक्ता जय मूर्तअमूर्ता । शरण येतों तुजला निज मूळ कांता ॥ सकृप होउनि मजला न्हेयी एकांता । माझें मज हें

निज गुज दावीं तत्वतां ॥ १ ॥ जय देव जय देव जय जी गुरु-नाथा । आपे आपणियांत करीं कां सनाथा ॥ ध्रु० ॥ व्यान उदान समान प्राण आणि अपान । श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा आणि घ्राण ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध जाण । अंतःकरण मन बुद्धि चिदहंकार लीन ॥ २ ॥ वाचा पाणी पाद शिश्न आणि गुद । आधार कमळींचा कमळीं मूळ बंद ॥ ओडी येणा जाळ धर घे विशुद्ध । त्रिकुट श्रीहट गोल्हाट औट पीठ पद ॥३॥ भ्रमरगुंफेमाजी सहजचि मंद । हाता योगी राजा तुटे भेदां-भेद ॥ सत्रावीचें अमृत घेतां सुखस्वाद । सोहिरा ह्मणे अद्वय-बोधें आनंद ॥ ४ ॥

(९)

तनसें जोग कमाया मनसें गयी माया । उन्हे आप छपाया मगन सौ भैया ॥ जय जय जी आलख गुरु गोरख नाथा । ह-रदमसें मिलाउं मेरा प्राणदाता ॥ ध्रु० ॥ देखो प्यारा सबसें न्यारा द्रिच्छ नहीं लच्छीं । अगम निगम गयतें ऊर्ध्व जलकी मच्छी ॥ साधक सिद्ध साधो गवगानके पक्षी । शून्य मंदिरका राम बात तो अच्छी ॥ जय जय जी० ॥ १ ॥ दुनियां ज्यांहासे होगी अनादका जोगी । मूबिन वाजत उनकी आनाहत सींगी ॥ कबहुं नग्न मग्न कबहुं बितरागी । तन्मयकी कंथा अंतरसें रंगी ॥ जय जय जी० ॥ २ ॥ देखो जैसो तैसो घट मटमें अम्मर । व्यापक सबसें तबसें औधूत दीगंबर ॥ चंद सुरज गयेथे महां सुनके अंदर । देता लेता कहता कोहीतें नहींयोगीर ॥ जय ज-य जी० ॥ ३ ॥ भ्रमरगुंफा मठमें गुरुजी अकेला । आवती जाती अल्लम नही पिनेवाला ॥ सोहिरा देखो लाल साहेबका चेला । अबतो पीता गुरुजी गैबका प्याला ॥ जय जय जी० ॥४॥

(१०)

सज्जनजनकुं दिल हरतनु मन प्रियकर जो। सबरंगादिक दिखला योगी अखीयां जो॥ अरि दील सुख नामीं ज्या दंडन करिता जो॥१॥ जयजय नीराकार निर्गुण अवधूता। दिल ज्योती खुरबान आरती जननाथा॥ध्रु०॥ तुम तरफे जो जन है इनकुं निज सूरत। दिखलाजे त्रे जी दाता बसकर उसचित्त॥ देखत सबसें दारें विवेक कर हात॥२॥ तुम फगमे जी ध्यान करेंकु तनुमन। निवताहे ज्यानहि सुने ज्यानत मदजन॥ आगे पिछे देखों सबका निर्गुण। सोहिरा करि जो आपने तेरा तनुमन॥३॥

श्लोक.

(१)

नीरालंब निरंजनीं मुळिं जिवा होऊनि जा गर्क हो। तेव्हां होति हें एकरूप समता इंदू अणी अर्कहो॥ जेव्हां राहिल हा तुझा बहुच कीं अवघाचि कूतर्कहो। सोहीरा ह्मणें दूर होइल तुझा तेव्हांचि हा नर्क हो॥

(२)

अर्थज्ञान हें कांहिं स्वल्प समजे तेणेंचि गर्वा चढे। साधू मी ह्मणें आपणा स्ववितसें वीवाद करतां उडे॥ आह्मां वांचुनि कोठ हे महिमधीं ज्ञानी दिठी ना पडे। सोहीरा म्हणे ऐसियासि तरी हो कैसेनि मुक्ती घडे॥

---

१ वृत्तानुरोधानें यांत ह्रस्व दीर्घ अक्षरें घातली आहेत. ह्रस्वोच्चाराकरितां ᵕ या व दीर्घोच्चाराकरितां – या चिह्नाचा उपयोग केला आहे.

(३)

नाना मत्त वितंड काढुनि भल्या कोणा तरी आडवी। त्याहूनी मज मुझलोक ह्मणती महिमा किं हे वाढवी॥ जितके उत्तम आपणासि असणें आशाचि हे औढवी। तो प्राणी सोहिरा ह्मणे अवहिती असते हे विभांडवी॥

(४)

भक्तानें भगवंत नित्य स्मरणीं हे काळक्रमणा किजे। योगाभ्यासिं निरंतरीं असुनियां हे इंद्रियां जिंकिजे॥ जीर्णद्वेषि पराणिये जपति जे वाचेचिये डंकिजे। सोहीरा ह्मणे हो तयासि सहसा सहवास हा ना किजे॥

(५)

दुष्टाला जरि संतसंगति घडे सद्बुद्धि नलगे तया। दुर्गंधीचि अपानद्वारिं उपजे सूगंध हो खातया॥ प्रेमें क्षीरचि पाजिलें तरि बहू विषची संपत्ति तया। साधूसंगति भक्तीवांचुनि असे तोची किं वैरी तया॥

(६)

ज्याला देखुनि सर्वभूतिं उपजे सामान्य नव्हे दया। तो सुश्रांत सदैव जाण मग त्या येथेंचि काशी गया॥ जो व्यापी सकळां श्रुतीं अगम जो दृष्टीसि आला जया। सोहीरा ह्मणे तो समान पाहतो रंका आणी राजया॥

(७)

सर्वेचि पाहातां उदासिन मना कांहींचि ना वाटते। हे पंचात्मक सर्व विश्वरचना संभूत हें आटतें॥ ना पाचारित आंगिं येउनि बहू वैराग्य हें दाटतें। सोहीरा म्हणे भ्रांतिचें वसन कीं निभ्रांत हें फाटतें॥

(८)

निर्गूणीं लय लावितां उपरमे हा जीव जातां भितो । काढी तर्क कुतर्क मूर्ख मणि हा वाच्यांश आरंभितो ॥ लोकां दावि हें सोंग ढोंग बरवें साधू नव्हे दंभि तो । सोहीरा ह्मणें तत्त्व-सार विवरीं जाणा सुखस्तंभि तो ॥

(९)

ब्रह्मानंदिं निमग्न होउनि असे तो जाण साधू भला । येऊनी नरदेहिं ज्यासि बरवा भगवान हा लाभला ॥ राहो या किं जनीं किं थोर विजनीं कोठें तरीं शोभला । सोहीरा ह्मणें जाण पंचविषयीं निःसीम जो क्षोभला ॥

(१०)

धेनूवर्ण अनेक भासति परी दुग्धांत नाना नसे । यावत् स्थावरजंगमादिकिं असे जो चाळितो मानसें ॥ होणें आपण हो किं त्यासि बरवें सर्वांहुनि लहानसें । सोहीरा ह्मणें बीज हें समजणें निर्गूण नीदानसें ॥

(११)

कोणी कारणिं भासे नासे जग हें शोधासि लागें मना । बोधें गुह्य हा ह्मा हो प्रतिदिनीं सांडी दुजी कामना ॥ कोण मी हें शरीर चालत कसें कां तूज हे कामना । सोहीरा म्हणे हे वरी निजखुणें चित्सूख आराम ना ॥

(१२)

जो नेती निगमा जितेंद्रिय दमा जो नागवे आगमा ॥ ज्याला आवडि त्यासि सांपडे गडी तो संतसमागमा ॥ दावी लावि मना परे परथडी तो आपुल्या ऊगमा । सोहीरा समजोनि जो उमजला पंथेचिया सूगमा ॥

(१३)

शाखा वृक्ष अनेक भासति परी एकाचि वृक्षाचिया । तैसें विश्व विवीध हें नगलिलाची हे मुमुक्षाचि या ॥ वाटे जाउं नका निमीषभरि तूं या सर्व लक्षाचिया । लक्षीं तूंचि अलक्ष्य लावि लयहो शब्दांत लक्षाचिया ॥

(१४)

निद्रेमाजि भ्रमांत स्वप्न दिसतें तैसें किं हें भासणें । ते नासे किं ततक्षणीं विलसतां जागृति वीकासणें ॥ ज्ञानाग्नी न समग्र हो करुनियां सर्वेंद्रियें लासणें । सोहीरा मग हो म्हणे निजपदीं आनंद उल्हासणें ॥

(१५)

वाचेचें मुळ जाणुनी गुळ करीं वाचाचि हे गातया । मासी मानस दासि होउनि कळो जेथील सूंगा तया ॥ चिर्तिसधू मिळसी मिळोनि मिळतें हे चित्तगंगा तया । तैसें ऐक्य किं सोहिरा म्हणतसे हें आत्मलिंगा तया ॥

(१६)

पिंडींचा रहिवासि तो न म्हणवे ब्रह्मांड रोमावळी । ज्याची तो किं समर्थ हा जगपति साकार हा मावळी ॥ तद्भक्तां सदैं सानुकूल प्रभु तो जो सर्व कां मावळी । हे वाचे स्मर सोहिरा म्हणतसे त्याचीच नामावळी ॥

(१७)

चंद्रामृत कणी चकोर संवके के दूसरे खाइल । निर्गुणीं मन वेधलें तनुचिया कीं पोपणा जाइल ॥ देवा तूं न दिसा तें काय जन हें देऊनियां देइल । स्वप्नींचें धन सोहिरा म्हणतसे कीं जागृतीं येइल ॥

(१८)

लोकीं आस निराश अंतरिं जथा हा जाण संन्यासि हो। संसारीं सम सारिखा दिसतसे आलिंगि शून्यासिहो॥ कोणी आदर भार फार करितां संकोच मान्यासि हो। सोहीरा म्हणॆं चिन्मयासिं रमला प्राशूनि मौन्यासि हो॥

(१९)

मिथ्या कल्पितसे भ्रमासि मन हें ध्यावा किं याचा खुन॥ हे रसने रस गुप्त वाहत असे घ्यावा किं या चाखुन॥ अंतर्ज्ञान तराजि घे समजुनि हा जीव किं जोखुन। सोहीरा ह्मणॆं कोण चिंतित मि हा पाहा किं नीरेखुन॥

(२०)

हा संसार पुरा किं म्या पाहातसें मिथ्याचि आकार हा। माया व्यापक जाण हे बहुविधा साभास वीकार हा॥ हे गूण-त्रय साम्य हो प्रसविली तैसीच ॐकार हा। सर्वांचें मुळ सोहिरा ह्मणतसे अंतीं निराकार हा॥

(२१)

मर्यादेवरि सागरा गिरिवरा कोणी धरीलि धरा। बारा सूर्य शशांक व्योमि व रुपे हा कोण धाराधरा॥ चव्वीसावरी एक पंचविसवें चळती कसीं पंधरा। सोहीरा उमजीं ह्मणे मम मना हे भक्ति गंगाधरा॥

(२२)

संसारीं रमसी मना भ्रमसि तूं कां भोगिशी आपदा। अ-भ्रींची किं हे सांउली दिसतसे कोणींचि हे संपदा॥शाल्यन्नोदन दिव्य भोग मिति हे कीं नूपजे श्वापदा। सोहीरा म्हणॆं कीं विवेक नसतां आरोढुनी ज्या पदा॥

(२३)

हीं भूतें धरती धरा स्थिरचरा कोणी नसे गोचरा। कीं पिच्छें उठतां उठोनि सुटतां ठावे नसे खेचरा ॥ जाड्यत्वें तनु-संगते वरी सरी पावूं नको भूचरा। सोहीरा ह्मणे लक्ष हें अनुदिनीं लावी किं अँगोचरा ॥

(२४)

आकाशावरि अभ्र भासत असे तैसेचि कीं हे जन। त्यांचा खूड धरी विवेक करितो सर्वज्ञ कीं सज्जन ॥ नित्यानित्य विचार सार करितां येणें भवाभंजन। सोहीरा ह्मणे राजयोगि-सदनीं जो भोगि नीरंजन ॥

(२५)

बोलाचें रुप देखुनी अनुभवें तूं बोल हा रामरे। तुर्या का-मिनि कांत जो जगपति एकांत आरामरे ॥ शब्दाचीं पठणें बहू शिकवुनि तें काय कीरा मरे। सोहीरा ह्मणे जाण चेष्टित तनू निश्चळ वारा मरे ॥

(२६)

या देहीं असतां जयासि दिसते विडल्कासिहो। ऐसे ज्ञान टिके तरी मग तया येथेंचि हे काशीहो ॥ ज्ञप्तीमात्र निखील हो निवटिलें अनेकिं एकासिहो। सोहीरा म्हणे दृश्य तें स्वरुप कीं न येचि तूकासि हो ॥

(२७)

हे राया करि हो दया अनुभवें ब्रह्मांड हें भेदिन। प्रापंचा-वरि इंद्रियां नियतया वरचेवरी छेदिन ॥ आनंदोत्तर मग्न होत असतां आम्हांसि हा सूदिन। यावें हें ह्मणे सोहिरा तुजप्रती म्यां मागतों कीं दिन ॥

(२८)

एकीं एकचि हा अनेक दिसतो नाहींच कीं दूसरा। ऐसें राहुनियां मनीं अनुदिनीं भेदासि हा वीसरा ॥ आपूलें रूप हें अरूप गमलें हें ज्ञान ज्यासीं सरा। सोहीरा जडहो जना म्हणतसे त्याचा करा आसरा ॥

(२९)

जोडीं सद्गुरुसी विलोकुनि कधीं होईं तुं निर्बधन। विश्वाचा धनि कोण हा करुनियां आरंभि आराधन ॥ इंद्रीयदमनीं निराळ गमनी योगाचें हें साधन। ज्ञानांजनिंचि सोहिरा ह्मणतसे हें सिद्ध माहा धन ॥

(३०)

सांडूनी तुजसारिखा प्रभुवरा आणीक कोणा भजों। ऐसे यावरि जोडला देह असे या मानवा लाभ जो ॥ ब्रह्मांडीं किं अनेक चित्र उमटे मायेसि आरंभ जो। सोहीरा ह्मणें जाण तूं अचळ हा तुर्या भुमी स्तंभ जो ॥

(३१)

या देहास मि कोण पाहात असें साक्षीचि कीं शोधिला। योगें आकळलें मनासि कळलें सर्वांचिये आधिला ॥ आनंदें किं निमग्न होउनि तया म्यां नित्य आराधिला। सोहीरा ह्मणें पाक हा गगनिंचा अग्नीविणें रांधिला ॥

(३२)

जो स्वामी सकळा जगा प्रसवला त्याचें तुं घे दर्शन। जो दूरी असतां अलिप्त विषयीं सृष्टीसी सूदर्शन ॥ होणें नाहिं गुरूविणें करि मना साधूपदस्पर्शन। सोहीरा सविवेक तूं करि ह्मणे संकल्प कीं निरशन ॥

(३३)

पासीं देव असे तुला किं न दिसे ते आड अज्ञान हो । त्याचा नाश करीं निरंजन वरीं प्रख्यात हे ज्ञान हो ॥ तें ही पावे लया जया किं निलया ते शुद्ध विज्ञान हो । तें भोगीति तें सोहिरा ह्मणतसे हे मुक्त सज्ञान हो ॥

(३४)

प्रारब्धाधिन देह हें किं असतां कोणावरी कोपसी । रात्रंदीवस खेद हा करुनियां भक्तीसि कीं लोपसी ॥ आतां सांगणें हेंचि सर्वहि मना जे ईश्वरीं ओपसी । सोहीरा ह्मणे विश्व हें मग तुला निश्वी दिसे ओपसी ॥

(३५)

प्रारब्धास्तव हें घडे तंव पडे देहासि कीं सोसणें । या जन्मार्जित कर्म भोगवि यया जैसें किं हें ऊसणें॥ ऐसें हें कळुनी उगें विकळुनी कोणावरी रूसणें । सोहीरा ह्मणे पंथ हा सुगम कीं चोरासि कीं पूसणें ॥

(३६)

रामावीणें जें नाम घेउनि जनीं कें वाउगा झांकसी। चौहाटावरि हे निधी किं दिसतां कें नेत्र तूं झांकसी ॥ स्वानूभवाविणेंचि टपणें पाखांड हे शीकसी । सोहीरा ह्मणे मुक्त पंक्ति जवळी कें फालसें वीकसीं॥

(३७)

गोडी मानुनिया मनीं अनुदिनीं संसार बांधी गळा । तो मायाजळिं मीन आमिषभुली आंसोडिला हो गळा॥ लक्षीं धांवति इंद्रियें बहुवसें दृश्यावरी आगळा । सोहीरा ह्मणे पाहिला जरि-तऱ्ही ज्ञानाविशीं पांगळा ॥

(३८)

अज्ञानें किं हे भास भासती परी एकेचि तंतू पटीं । तैसा विश्व विलास वेष धरितो एकेचि हा कापटी ॥ जो संकल्प विवीध भासवि तया ठेऊ नका नेपटीं । सोहीरा इतुलेनि बैस ह्मणतो अजरामराचे पटीं ॥

(३९)

शालीकीं दुपटे न रूचुनि रुचे वनवासिया घोंगडी। कीं नीरीं बुडणेंचि गोड गमतें त्यासी नको सांगडी ॥ अज्ञानें भ्रमितासि नावडे तसा साधू गडी वांगडी । सोहीरा ह्मणे हो पराभव तया के होय माना गडी ॥

(४०)

हा कल्पतरु खांडुनी करिसि तूं के हीवरा कूपहो । झांकूनी किं हे नेत्रमंडळ पाहासी आविसांरूपहो ॥ अव्हेरुनि हें सूरभी-दुभतिये घे कूर्मिचे तूप हो । सोहीरा ह्मणे ज्ञानहीन नर तो अज्ञान अमूप हो ॥

(४१)

तूं राजा असशी परी न दिससी या मानसापायका । तूझा तूंचि जनीं जना वळख तूं कीं आपणा नायका ॥ तूझा सन्निध गा जगा प्रसवली हे प्रकृती नायका । सोहीरा ह्मणे देव सूलभ तुह्मा ज्ञानप्रधाना यका ॥

(४२)

होता वोढ आगाज कीं परि पाहा ते केवढी सीवती। सत्ता-सूक्षम संनिधानि किं तसि जी इंद्रियें राबती ॥ वोढी हातभरी वरोनि शरते दूरी किं हो लांवती । सोहीरा ह्मणे ज्ञानवर्म कळतां हे कल्पना थांबती ॥

(४३)

गूणासी लॅागणें तरी न ह्मणणें परिसासि पाषाण हो । गाईचें पाहतां पवित्रपण तें विष्टा नव्हे शाण हो ॥ चिंदी हातभरी परी मिरवलें जें राजनीशाण हो । सोहीरा ह्मणें संतमान्यवतरी कैशेनि दूषण हो ॥

(४४)

या कामासि मनीं प्रवेश घडतां भुललासी रामा किं रे । नोहे हें सुख जाण केवळ तुं हा प्यातोसि समाकिरे ॥ ज्या यंत्रें नळिकेचिया पढतसे पासीचिसमा किंरे । तेवीं कीं म्हणें सोहिरा भ्रमरुपें अंतरसि रामा किंरे ॥

(४५)

पाठीं स्वामि समर्थ देव असतां भक्तांसि कें वाणहो । आर्धी संकट पाडितो परी पाहा पाहात निर्वाणहो ॥ तुर्या कामिनि हे सुवासनिस दे या मानसा वाणहो । सोहीरा मग हो ह्मणे उठतसे हे सिद्धिकज्वाणहो ॥

(४६)

सर्व सज्जन जाण निश्चित वरी शत्रू तो पैसा कि हो । आटा-आदि करोनि वेचित बहू जे प्राण रैसा किहो ॥ जैसा त्या हिरवा तृणीं लगबगां धांवतो ह्मैसा किं हो । तैसें तें नको सोहिरा ह्मणतसे स्वानंदें वैसा किं हो ॥

(४७)

आनंदें भजिजे सदा किं पुजिजे आकाशिचा कूपहो । इंद्रीयें सुमनेंवरी झडकरी देवायुचा धूपहो ॥ सोहं गंधसुगंध लेपुनि पाहा तूं आपुलें रूपहो । सोहीरा ह्मणे तीन्हि पालट क्षणी नीवटे जैसें तुंहो ॥

(४८)

आत्माग्नीवरि हा जिवित्व नग तूं सेवेंचि ऊलाखहो। साचोटी पढती वरी हे कढती जाणीव चीलाखहो ॥ हे मी भेद नसे हें डांक मनसे हा द्वैत सूलाख हो। सोहीरा ह्मणें सृष्टी हे निपजती लाखांचें हे लाख हो ॥

(४९)

तीन्ही ताप हें देखुनी उपजला अनुताप चित्तास हो। साला ब्रह्म पदीं सदीं किं मिळतां नलगेचि हातास हो ॥ माया भासत व्यापकी पटकिं हा जो एक सूतास हो। सोहीरा ह्मणें सर्व ब्रह्म दिसेंत सद्गुरु सूतास हो ॥

(५०)

होते वाढ असोनि काय करणें मीती लघूकेतकीं। मोठा वृक्ष असोनि काय पाहतो काजासिये केतकीं॥ तैसें माइक जाणुनी उमजला जो नाथसंकेतकीं। सोहीरा म्हणें तो हिरा निपजला विश्वस्फटीकांतकीं ॥

(५१)

चंद्राचे उदयीं समग्र भरती येती जसी सागरा। उद्यानें सुमनें वसंतसमयीं वृक्षासि कीं डोंगरा ॥ वस्तू संनिध गा जगा प्रसवली हे प्रकृती नागरा। सोहीरा ह्मणेची जळींसि निपजे हें लोण मायागरा ॥

(५२)

याची कारणें त्यां ह्मणें तुज मना जा आपुले ऊगमीं। गंगा जैसि मिळे रुळे अनुदिनीं सिंधूचिया संगमीं ॥ माते भासणें ही वहू उमजली कुंटी जसी नीगमीं। सोहीरा ह्मणें ध्यावि चित्कमळीं तूं हे तृप्ति सारंगमीं ॥

(५३)

भ्रांती हे दमती कळाचि गमती चिद्वृत्ति उद्दामती । बुद्धीये समती विवेकें रमती अभ्यासमुद्दाम ती ॥ आनंदें गमतीं करोनि वमती तन्मात्र लुब्धा मति । सोहीरा कुमती प्रपंचिं घुमती आत्म्यासि बेफामती ॥

(५४)

हा वैकुंठपती मनी जें जपति त्यां पातकें कांपती । देहा संगें हिरा पतीत मर जें ब्रह्मार्पणें घापती ॥ देतो हे संपत्ति कधींचि विपत्ती संसारें नालंपती । सोहीरा ह्मणें ना कधीं विलंपती संरक्षि त्या श्रीपति ॥

(५५)

हा गोविंद तुं वंद नंदसुत तो गौळ्यांत अवतार हा । वेणू वाजवि धेनु चारित उभा राहाताणवतारहा ॥ योगी भोगित गोपवृंदवनिता पाहूनि नवतारहा । सोहीरा ह्मणें माग अंतसमयीं स्वामी तुं भवतारहा ॥

(५६)

आम्हां दुर्लभ गोपिवल्लभ हरी जो वश्य भक्तां तयां । धाती अंतरिं जो निरंतर मुखीं सद्भावने गातयां ॥ सिद्धांतीं रमती कळा हें गमती हे संत सांगा तया । सोहीरा ह्मणें दुर्गती चुकउनी मोक्षासिया जातया ॥

(५७)

हे पारंगत ग्रंथ सर्वहि करी आनंद नाहीं मना । जिज्ञासू किं विजाति होउनि जनीं मान्याचि हे कामना ॥ आत्मा अंतरला अनंतरुपें हा चित्तींचि हे फामना । सोहीरा म्हणें जाण तूं ममतया कल्पांति आरामना ॥

(५८)

हा विष्णू भगवान संकटीं हरी दासांसि जो सारथी। स्वामी आपण अर्जुना रथिं वसे प्रख्यात जो भारथी॥ देखोनि कुळगोत्र श्रेष्ठ गुरु ते तो वीर हो वीरथी। सोहीरा ह्मणे तेचि युद्ध भवीले हे ज्ञान भागीरथी॥

(५९)

जैसा त्या जळिं हो विकाश कमळीं देखोनियां दिनमणि। आकारीचि असोनि ध्याई मनिं तो भगवंत चिंतामणी॥ ज्ञानाचा अधिकार पावुनि दिसे सद्बुद्धि हे चीमणी। सोहीरा ह्मणें जाण मुक्तपणिं ते जीवंतची निजमणी॥

(६०)

आकारीं भगवंत देख बरवा कैशा परी वर्तता। डोळा कान किं नाक मूख दिसतें वर्ताचि वीवर्तता॥ सत्ता आपुलि आपणाधिन असे तो शून्यि कीं पर्ततो। सोहीरा ह्मणे तोचि संत समजा आनंदेंची नर्ततो॥

(६१)

योगें आकळ याकिं प्राणपवना ब्रह्मांडिं जो न्यावया। आत्मारामचि हा समुद्रपर्वणी ऊदीत जो न्हावया॥ आपें आपण तदपी विलयता दर्शन हें घ्यावया। सोहीरा ह्मणे हेंचि कारण मुळीं वैराग्य नीघावया॥

(६२)

जन्मा येउनि कीं जयासि बरवा भगवंत हा लाभला। तो प्राणी किं घरीं वनांतारिं असो कोठें तरी शोभला॥ देवा गातसें ध्यातसे मनिभला जाईल तेथें भला। ज्याणें हो ह्मणे सोहिरा निशिदिनीं वितराग आरंभला॥

(६३)

भक्ती हे करितां जयावरी असे भगवंत संतुष्ट हा। नाहीं मानॉपमान कांहिं न धरी नामामृतें पुष्ट हा॥ नाहीं क्लेश किं लेश मानसिं जया उद्देश ना दुष्टहा। सोहीरा ह्मणें देव पाहत असे सृष्टींत अदृष्ट हा॥

(६४)

योगाचें बळ पूर्ण तूं करुनियां नीरंजनीं ने मना। तेव्हां हे तुज सोडि नित्य प्रतिती संसारिं हे कामना॥ नीरालंब अनंत सत्यस्वरुपीं करणे पडे गामना। सोहीरा ह्मणें तो स्तवीं किमपि हो केव्हांचि बेफामना॥

(६५)

भावार्थें किं पतीतपावन हरी भक्तांसि जो भेटतो। मिथ्या दावि प्रपंच सर्व करितां अवघीचि कीं वेट तो॥ मोहांतूनि हें काढुनी मन किं हें नीरंजनीं नेटतो। सोहीरा ह्मणे दृश्य संगतिविना आनंदची खेटतो॥

(६६)

देवाला स्मर तूं दुरीत हर तूं संदेह नीवार तूं। कांहीं हारविहार तूं कारिं कम भ्रांती अनीवार तूं॥ चित्ताला किं सुधार तूं अनुभवें हा जीव उद्धार तूं। सोहीरा ह्मणें लाविं तूं लय किं हें त्या नित्य शुद्धा रतूं॥

(६७)

पिंडामाजि हें सर्व जाणति कळा साक्षीचि लक्षीतसे। वेतीरेक मुखीं हे भासत मनीं दृश्याचि भक्षीतसे॥ जाणोनी किं हें नेणिवां रमति जे विज्ञान दक्षीतसे। सोहीरा ह्मणें एकदेशि नव्हती हे सर्व पक्षी तसे॥

(६८)

घेऊनी समता शरीर ममता सांडूनि सत्संगति । गाति ध्याति अनंत ईश्वररुपीं आनंदेंची रंगती ॥ बैसोनी किं यॉ एक मेळ सरिशा अर्थाचिया पंगति । सोहीरा ह्मणें ते पुजूं भगवती अर्धांग ऊपांगति ॥

(६९)

हा पूर्वार्जित योग भोग बरवा देहासि या भोगवी । या जीवा सिवरूप लाधलें तरी आयुष्य हें जोगवी ॥ निर्वीकल्पस्थिती असोनि सहज्या हा संग आरोगवी । सोहीरा म्हणें अंतरीं विहिन तो बाहिर दिसे सोंगवी ॥

(७०)

आपण तो किं समान मानित मनीं साधूसिं संसारि हो । त्याला पाहत दान वावत वरी क्षोभेल कंसारि हो ॥ मूका अंध बधीर कुब्ज घडवी जन्मोनि भीकारि हो । सोहीरा ह्मणें जेथ जाइल तया कोण्ही हि धिःकारि हो ॥

(७१)

ज्याला प्रीय असो अरण्य गृह कीं आसेल तैसा असो । जो भगवंत अनंत विश्वरुपिं तोपाहेल तेथें दिसो ॥ आह्मां कोण तों अर्थ स्वार्थ बरवा परमार्थ चित्तीं वसो । सोहीरा म्हणे तोचि संत समजा बैसेल तेथें वसो ॥

(७२)

लंडी दंडि वितंडवाद करि जो तो मूर्ख पाखांडि हो । काढी कल्प उगेंचि अल्प मतिनें मध्येंचि मूपाडि हो ॥ बोधींना जडते विजाति पडते काढीत कुष्मांड हो । सोहीरा ह्मणें साधु सूर्य उदयीं हा राहु घुष्मांड हो ॥

(७३)

या ब्रह्मार्पण कर्म हें करुनियां नैराश्य कीजे फळा । येणें वीण कळा किं जाण सकळा ज्ञानेविने निष्फळा ॥ वैराग्यें हि अर्हर्निशी करुनिया अंतर्गता चौफळा । सोहीरा ह्मणे जैशि नागलतिका फळलेविणे सूफळा ॥

(७४)

ज्या वर्माविणे कर्म हें करुनियां शुद्धांश तो सांडिसी । राखोडी फुकणें कणावीणे उगा कोंडा किं तो कांडिसी॥ टाकूनी मुटिकांवरी किं लटिका व्यवहार हा मांडिसी । सोहीरा निज धैर्य दुर्ग म्हणे हे ज्ञानेविणे पाडिसी ॥

(७५)

हे सृष्टी सकळैक वर्तत असे ज्याकी निरोपावरी । त्या ज्ञानें किं उदासि होउनि मना घे भक्तिची पावरी ॥ दृष्टी देउं नको निमीषभरि तूं या दृश्यरोपावरी । सोहीरा ह्मणे लावें तूं लय किं हें या नीजरूपावरी ॥

(७६)

आदी अंत नसे जगातित असे ज्याचेनि सर्वहि दिसे । ते सत्ता किं अनंतरूपिं विलसे हें ज्ञान संतीं वसे ॥ चित्ताला नुमसे अहंकृतीं वसे ते जाण प्राणी पिसे । सोहीरा ह्मणे पातले जिव दशे लुब्धोनि दृश्यीं कसे ॥

(७७)

नित्यानित्य विचार नित्य करितां उद्धार होतो जिवा। जेवीं कीं हॅा विकाश होतो वरवा दीनोदयीं राजिवा॥ तेवीं संतसमागमें उमजुनी चिंचितनीं ताजिवा । सोहीरा ह्मणे पाववो अनुभवें भगवान चीरंजिवा ॥

(७८)

देवापासि तुझा नियेत असतां ताठाचि नाहीं तुला । कोणी एकविषी अपूर्ण न करी कल्पीत या हेतुला ॥ अदृश्यीं असतां प्रकाशत भला आत्माचि हा आंतुला । सोहीरा ह्मणे भक्त हो मग तुला संसार हा के तुला ॥

(७९)

चित्सूर्य उदयीं किं येत असतां संसार नाशी तमा । तेव्हां कोण मि हा उलाटुनि पहा बोधासि या उत्तमा ॥ ऐसें कोण करी तरी परि सिरी सद्गुरुचा हातमा । सोहीरा ह्मणे हो जनीं मग तया कोणाचि नाहीं तमा ॥

(८०)

कोणाचीच आशा तुं हो धरुं नको परमेश्वरावांचुनी । कोण्हा आचरणी कृपा करि हरी ग्रंथीं पहा वाचुनी ॥ अभ्यासें मन लाव शून्यभुवनीं पाहा कसें लांचुनी । सोहीरा ह्मणे या भवांतुलीपुढें नर्कासी या कांचुनी ॥

(८१)

भगवंताचें स्वरूप चर्मदिठिला कैसे न तें भासतें। जेथें तेथचि पाहतां गगन ते शून्येंचि आभासतें ॥ आलें नामरुपा सगूण-पण तें तत्काळ हो नासतें । सोहीरा म्हणे ब्रह्मरूप उगमीं ठाईं-चि तें आसतें ॥

(८२)

औट हात शरीरबंध पडतां आह्मीं ह्मणे थोर हा । विषयांचें सुख सेउनी संत्रकला कायेमध्यें चोर हा ॥ मिथ्या आदरि तो किं हा मृगजळीं संसारची घोर हा । सोहीरा ह्मणे नर्क भोगि पुढति माहान कीं घोर हा ॥

(८३)

कैसी प्रीति बसेल त्या हरिपदीं निःकाम पुण्याविणे । फळ हेतुस्तव कर्म हें करि तयां संसार वोढी जिणे ॥ दारापुत्र कलत्र वित्त मदिरा वीषचि जैसें पिणे । सोहीरा ह्मणे जाण हो पुनरपी यातायती जुंपिणें ॥

(८४)

परब्रह्मरूपेंचि हे लोक सारे । जगद्रूप आहे तरी तो कसारे ॥ न ठावें तरी सद्गुरूसी पुसारे । ह्मणे सोहिरा त्याविणे रीपु सारे ॥

(८५)

विवेकें पहातां तदीं देह नाहीं । जया दृश्य दृष्टत्विं संदेह नाहीं ॥ जिवन्मुक्त आहे कीं संसार सारा । ह्मणे सोहिरा देख तूं ब्रह्मसारा ॥

(८६)

धरीतोसि हे वाउगी आश कीं गा । भुलीचे भुरोरे किं हे आश कींगा ॥ असोनी घरीं अन्न ऊपास कां गा । ह्मणे सोहिरा देवऊपासकां गा ॥

(८७)

जनीं येउनी लागतो ब्रह्म लागा । हरीभक्त सज्ञान वाटे मला गा ॥ जयासी समाधीविणे आसवेना । ह्मणे सोहिरा दृश्यि जो आशवेना ॥

(८८)

निःप्रिय होइन कोहाट काहो । संसारमेळा नको हा टकाहो ॥ सर्वत्र ब्रह्म किमीं झुटकाहो । सोहीरा ह्मणे येणेंची सूटकाहो ॥

(८९)

मीं कोण देहीं जऱ्ही हा कळेना । सिद्धचि हा देव तया कळेना ॥ साधू जया संगतीला मिळेना । सोहीरा ह्मणे तो गतीला मिळेना ॥

(९०)

जगबुद्बुदाचें पहा एक वारी । त्याचेनि संगें हे चूकेल वारी ॥ तेथेंचि तूं मीळुनी ऐस कीं गा । सोहीरा म्हणे त्याग ही आश कीं गा ॥

(९१)

पंथचि हा सुगम सुचविला । लावियलें सुरस सुचविला ॥ ऐशी हे आहे गुरुनाथदया । सोहिरा ह्मणे विद्गद जो हृदया ॥

या पुस्तकांत आलेल्या पद्यांची सूचीः

सवाया.

सेली.

आरत्या.

श्लोक.

☞ "उन्मनी हे लागली" (पृष्ठ १०२, पद २३); "मन मग्न केलें गुरुनाथें" (पृष्ठ १०३, पद २५); आणि "काय त्यां सांगो अगोचर नवल तुझें हो" (पृष्ठ ११५, पद ६०) हीं पदें या संग्रहांत दुबार पडलीं आहेत तीं चुकोनें आलीं आहेत असें समजावें.